|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ अंक : ३७ सोमवार दि. १६ सप्टेंबर २०२४ ते रविवार दि. २२ सप्टेंबर २०२४ पाने : ८ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## संशयाच्या भुताने पतीला घेरले रागाच्या भरात पत्नीला ठार मारले

विरार/क्राईम रिपोर्टर

नोकरदार पत्नीच्या चारित्र्यावर संशय गेहून तिची पतीने हत्या केल्याची घटना विरार येथे घडली आहे. या प्रकरणी मुलीच्या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपीला अवघ्या ६ तासात अटक केली. विरार पूर्वच्या वावटेवाडी येथे मुळ कर्नाटकातील असलेला गोपाल रामजी राठोड हा पत्नी व मुलीसह विरार पूर्वच्या वावटेवाडी येथे राहतो. गोपाल राठोड हा इमारत बांधकामावर गवंडी म्हणून काम करतो. तर त्याची पत्नी भारती बोरिवली येथे पेशंट सांभाळण्याचे काम करते. राठोड दांम्पत्याला एक मुलगी असून ती ...पान २ वर

## घरात गणपती असताना भयानक प्रकार घडला गर्भवतीसह पती व मुलाच्या रक्ताचा सडा पडला






कर्जत/क्राईम रिपोर्टर

सध्या गणेशोत्सव सुरु आहे. सर्वत्र मंगलमय वातावरण आहे. ज्यांच्या घरात गणपती आहे अशा घरातील कुटुंबांमध्ये किती जरी वाद असला तरी घरात गणपती असताना लोक कौटुंबिक वादापासून दूर राहतात. पण कर्जत तालुक्यातील पोर्शीपाडा येथे मात्र एक भयंकर घटना घडली आहे. घरात गणपती असताना कुटुंबातील पती पत्नी व त्यांच्या मुलाची हत्या करण्यात आली. विशेष म्हणजे मृतांमधील महिला गर्भवती आशा सेविका आहे. या घटनेने संपूर्ण कर्जत तालुकाच नव्हे, तर रायगड जिल्हा हादरून गेला आहे. या हत्या प्रकरणी संशयित म्हणून मृत इसमाच्या सख्ख्या भावाला अटक करण्यात आली आहे. कारण दोन भावांमध्ये राहत्या घरावरून वाद होता आणि याच वादातून एका भावाने दुसऱ्या भावाची त्याच्या पत्नी व मुलांसह हत्या केल्याचा संशय आहे. घरात गणपती असताना एक भाऊ आपल्या सख्ख्या भावाबद्दल इतका टोकाचा निर्णय घेऊ शकतो हि कल्पनाच डोके सुन्न करून टाकणारी आहे. कुटुंबात दोन भावांमध्ये वडिलोपार्जित संपती किंवा शेतीच्या वाटणीवरून वाद असतात आणि या वादातून हाणामारीच्या घटनाही घडलेल्या आहेत तर काही ठिकाणी भावाने भावाचा मुडदा पडल्याच्या घटनाही घडलेल्या आहेत. आकारण आजकाल माणूस इतका स्वार्थी झाला आहे कि स्वतःपलीकडे तो कुणाचाही विचार करीत नाही आणि त्यामुळेच रक्ताची नातीही रक्तरंजित होतात. पण सणासुदीच्या दिवसात घरात गणपती असताना, कुटुंबात मंगलमय वातावरण असताना रक्ताच्या नात्यात रक्ताचे पाट जर वाहत असतील तर समाजातील कुटुंब व्यवस्था संपुष्टात आली आहे असे समजावे लागेल. आणि तसे झाले तर या समाजातील माणूस यापुढे माणूस म्हणून जगण्याच्या लायकीचा राहिलेला नाही, तर तो पशु बनलेला आहे आणि समाजात जंगलराज येऊ घातले आहे. त्याचेच अशा घटनांमधून संकेत मिळत आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या प्रकरणी संशयित म्हणून मृत मदन पाटलांचा भाऊ हनुमंत पाटील याला संशयित म्हणून अटक करण्यात आली आहे.

कर्जत तालुक्यातील चिकणपाडा या गावाच्या बाहेर असलेल्या पोशिर पाडा येथे तिघांची हत्या करण्यात आली आहे. पती, पत्नी आणि एक लहान मुलाचा खून करण्यात आला असून या प्रकरणी संशयित म्हणून मयत तरुणाचा भावाला ताब्यात घेण्यात आले आहे. तर विवाहित महिला ही सात महिन्यांची गरोदर असून त्या आरोग्य विभागात आशा सेविका म्हणून कार्यरत आहेत. दरम्यान घरात गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना झालेली असताना मध्यरात्री तिघांचे खून झाल्याने कर्जत तालुका हादरला आहे. नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावर चिकणपाडा हे मुस्लिम बहुल गाव असून या गावाला लागून पोशीर पाडा ही हिंदूंची लहानशी वस्ती आहे. त्या ठिकाणी १५ वर्षापूर्वी कळंब जवळील बोरगाव येथील जैतू पाटील यांनी जमीन खरेदी केली होती आणि त्या ठिकाणी घर बांधून ते कुटुंब राहू लागले. जैतू पाटील यांच्या मदन आणि हनुमंत या दोन्ही मुलांची लग्ने देखील चिकणपाडा मधील पोशिर पाडा येथील घरी झाली आहेत. १३ वर्षापूर्वी जैतू पाटील यांच्या मोठ्या मुलाचे मदन पाटील यांचे लग्न झाल्यानंतर जैतू पाटील हे आपल्या पत्नीसह बोरगाव येथे राहायला गेले. त्यामुळे त्या घरात मदन तसेच त्याची पत्नी मुलगा आणि भाऊ हनुमंत जैतू पाटील असे कुटुंब राहत होते. ...पान २ वर

## २ लाखांची सुपारी देऊन साधला नेम संपत्तीसाठी सुनेनेच केला सासूचा गेम





नागपुर/क्राईम रिपोर्टर

**सासू सुनेचे सहसा पटत नाही, त्यांच्यात नेहमीच कुठल्या न कुठल्या कारणावरून वाद होत असतात. अशातच दोघीही विधवा असल्या आणि घरात कुणी पुरुष नसला तर त्यांच्यातील वाद मिटवणारा कुणी करता पुरुषच कुटुंबात नसल्याने सासू-सुनेतील या वादाचा भयंकर शेवट होतो. नागपुरात राहणाऱ्या स्मिता ओक आणि त्यांची सून वैशाली ओक दोघीही विधवा होत्या. मात्र तरुण सुनेचे बाहेर कोणाशी तरी लफडे आहे असा सासूला संशय होता याच संशयातून दोघींची भांडणे होत असत, त्यातच सासूच्या संपत्तीवर सुनेचा डोळा होता. त्यामुळे सुनेने चुलत भावना २ लाखांची सुपारी देऊन सासूचा काटा काढला. या प्रकरणी सर्व आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.**

स्मिता ओकार राऊत या ५४ वर्षीय महिला आपल्या पतीच्या आणि मुलाच्या निधनानंतर सुन वैशाली व तिची पाच वर्षीची मुलगी याचेसोबत राहत होत्या. वैशाली ही आपल्या पतीच्या निधानानंतर एकटीच राहत होती. तसे त्या दोघींना एकमेकीना आधार होत्या. स्मिता राऊत याच्या पतीच्या निधनानंतर त्याच्या पतीची सपुंर्ण प्रॉप्रटी ही त्याच्या नावावर चढली होती. त्यातच दोघीच घरी राहत असल्याने त्या दोघींचे कधीच एकमेकीशी पटत नव्हते. त्याच्यात रोज कोणत्या ना कोणत्या कारणातून भांडणे होत असायची. या भांडणात सुन वैशाली ही सासु स्मिता यांना वरचढ ठरत होती. ती त्यांना घालून पाडून बोलत असायची. त्याचा सतत अपमान करायची. तुमच्या नावावरची संपुर्ण प्रॉप्रटी आपल्या नावे करा असे ती त्याना म्हणायची. परंतु सुन वैशाली ही बाहेर कुठल्या तरी पुरूषाला चिकटली आहे याचा संशय तिच्या सासुला होता. त्यामुळे त्या तिच्या नावे संपुर्ण प्रॉप्रटी करायला त्या तयार नव्हत्या. त्यामुळे वैशाली ही तिच्यावर चिडून होती. म्हातारी मेली की संपुर्ण प्रॉप्रटी आपल्या नावे होऊ शकते हे तिला माहिती होते. त्यामुळे ती काही सासुला पटवूनच घेत नव्हती. कोणत्या ना कोणत्या कारणातून ती सारखी भांडणे काढत होती. खरे तर वैशाली ही तशी सुशिक्षित होती. तिच्या ऐन जवानीत तिचा नवरा वारल्याने तिचे जीवन एकटे झाले होते. आपण तरी किती दिवस आपले मन मारून राहयचे असे तिला वाटत होते. पदरात एक पाच वर्षाची मुलगी होती. तिचे शिक्षण पुर्ण करायचे तिला आपल्या पायावर उभे करायचे एवढे तिचे ध्येय होते. परंतु तिची सासु तिला काही जगू देत नाही असे तिचे म्हणणे होते. कारण भांडणात सासु ही तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तु कुठे जातेस. काय करतेस आणि कोणाला भेटतेस असे म्हणून ती तिचा छळवाद करीत होती. सासु आपल्या ...पान २ वर

## दारुड्या पतीने छळ केला फार रागाच्या भरात पत्नीने केले ठार

पुणे/क्राईम रिपोर्टर

**दारूडा माणूस हा संपूर्ण कुटुंबासाठी त्रासदायक ठरलेला असतो. खास करून पत्नी आणि मुलांसाठी तर असा माणूस डोकेदुःखी ठरलेला असतो. पण शेवटी माणसाच्या सहनशीलतेलाही मर्यादा असतात. जेंव्हा त्यांची सहनशीलता संपते तेंव्हा मग माणूस नातीगोती सारे काही विसरून जातो. पुण्यात एक नेपाळी सुरक्षा रक्षक नेहमी दारू पिऊन पत्नीला त्रास देत असे. त्यामुळे पत्नी त्याच्या त्रासाला कंटाळली होती. अखेर एके दिवशी चिडलेल्या पत्नीने रागाच्या भरात पतीवर चाकूचे वार करून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पत्नीला अटक केली आहे.**

त्रासामुळे महिलेने मद्यपी पतीचा चाकूने भोसकून खून करण्यात आल्याची घटना सिंहगड रस्ता भागात रविवारी सायंकाळी घडली. याप्रकरणी सिंहगड रस्ता पोलिसांनी पत्नीला ताब्यात घेतले. किरपा बिष्ट (वय ४२, मूळ रा. नेपाळ) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी पत्नी हिरा बिष्ट (वय ४६) हिला सिंहगड रस्ता पोलिसांनी रात्री उशीरा ताब्यात घेतले. बिष्ट मूळचे नेपाळमधील आहे. नऱ्हे भागातील मानाजीनगर परिसरात असलेल्या स्वप्नपूर्ती रेसीडन्सी सोसायटीत ते रखवालदार म्हणून काम करायचे. किरपाला दारू पिण्याचे व्यसन आहे. तो दारु पिऊन पत्नी हिराला त्रास द्यायचा. या कारणावरुन त्यांच्यात नेहमी वाद व्हायचे. ...पान २ वर

## ओळखीच्या माणसाने विश्वासघात केला तीस लाखांसाठी परिचारिकेचा जीव गेला



मयत स्नेहलता







जळगाव/क्राईम रिपोर्टर

**आजकाल कोणी कोणावर विश्वास डोळे झाकून विश्वास टाकत नाही. कारण ज्याच्यावर विश्वास टाकावा तो कधी गळा कापील याचा नेम नाही आणि नेमकी हीच गोष्ट जिल्हा परिषदेच्या आरोग्य केंद्रातून निवृत्त झालेल्या परिचारिका स्नेहलता चुंबळे यांना कळली नाही त्यांनी जिल्हा परिषदेतील आपले सहकारी जिजाबराव पाटील यांच्यावर विश्वास ठेवला आणि त्यांना बँकेतून ३० लाखांची रक्कम काढण्यासाठी सोबत नेले, पण जीजाबचा स्नेहलताच्या ३० लाखांवर डोळा होता. त्याने अगोदरच आपल्या साथीदारांच्या मदतीने स्नेहलताला लुटण्याची योजना आखली होती. त्यानुसार सलवा येथून नाशिककडे येत असताना वाटेतच जिजाबराव व त्याच्या साथीदारांनी स्नेहलताचा गळा दाबून तिची हत्या केली आणि पैसे घेऊन पोबारा केला. मात्र पोलिसांनी या विश्वासघातकी आरोपीला अटक केली आहे.**



स्नेहलता अनंत चुबळे या सेवानिवृत्त जिल्हा परिषद कर्मचारी होत्या. साळवा ता. धरणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात परिचारिकेची सेवा बजावल्यानंतर सन २०२३ मधे त्या रुग्ण सेवेतून निवृत्त झाल्या होत्या. जळगाव शहरातील खोटे नगर परिसरात त्यांचे स्वतःचे घर होते. त्यांचा ...पान २ वर

## मुलीचा संसार मोडताच तिचा बाप चिडला मेव्हण्याच्या मदतीने भावाचा मुडदा पाडला





गोकाक/क्राईम रिपोर्टर

संशयातून चिडलेला माणूस नातीगोती बघत नाही, त्याच्या मनात केवळ सुडाची भावना असते. कल्लोळ येथील भिमाप्पाच्या मुलीचे लग्न जमत नव्हते. याला कारणीभूत आपला भाऊ विठ्ठलच आहे असा भिमाप्पाला संशय होता. याच दरम्यान कसे तरी त्याच्या मुलीचे लग्न जुळले, पण ती दोन महिन्यात गर्भवती राहिल्याने सासरच्या लोकांना संशय आला व त्यांनी मुलीला माहेरी पाठवून या घटनेबाबत तिच्या बापाला म्हणजेच भिमाप्पाला जाब विचारला अगोदरच समाजात अब्रू गेल्याने भमाप्पा चिडला होता. त्यातच विठ्ठल बरोबरच्या भांडणात विठ्ठलने तुझी मुलगी गावात शेण खात होती म्हणून तिला नवऱ्याने टाकले असे म्हणताच भिमाप्पा अधिकच बिथरला आणि आपल्या मुलीचा संसार मोडण्यास आपला भाऊच जबाबदार असल्याची त्याची खात्री पटली. त्यानंतर त्याने आपल्या मेव्हण्याच्या मदतीने भावाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे. घटप्रभा जवळील कल्लोळ येथे विठ्ठल गोविंदाप्पा ...पान ६ वर

## अनैतिक संबंधाचा अखेर भयंकर शेवट झाला चारित्र्याच्या संशयावरून प्रेयसीचा खून केला

पुणे/क्राईम रिपोर्टर

**अनैतिक संबंध हे अळवावरच्या पाण्याच्या थेंबासारखे असतात. हा थेंब त्या पानावरून कधी निसटून खाली पडेल याचा नेम नसतो. त्यातच स्त्री व पुरुषाला पोटाच्या भुकेबरोबरच शरीराचीही भूक असते. त्यामुळे शारीरिक आकर्षणातून स्त्री-पुरुष एकत्र येतात. पण अशा नात्याला चेहरा नसल्याने त्याचा कधीही शेवट होऊ शकतो. नवऱ्याला सोडून वेगळी राहणारी शिवानी आणि पत्नी कायमची माहेरी गेल्याने एकाकी पडलेला रिक्षावाला विनायक यांचे सुत जुळले. पण कालांतराने तो तिच्यावर संशय घेऊ लागला आणि याच संशयातून त्याने तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी विनायकला अटक केली आहे.**



पिंपरी चिंचवड जवळील काळेवाडी येथील एमएम चौकात विनायक आवळे हा आपल्या कुटूंबासह राहयला आहे. गेल्या काही वर्षापूर्वी त्याचे लग्न झाले परंतु त्याचे व त्याच्या बायकोचे पटत नसल्याने ती त्याला सोडून तिच्या माहेरी राहयला गेली असल्याने तो दारूच्या नशेतच कायम राहत होता. आपल्या पोटापाण्यासाठी तो पिंपरी चिंचवड येथे प्रवाशी रिक्षा चालवित होता. खरे तर त्याच्या दारू पिण्याच्या सवयीमुळे आणि घरात तो खर्चाला काही देत नसल्याने त्याचे व त्याच्या बायकोची नेहमीच भांडणे होत होती. त्यामुळे ती त्याला सोडून गेली होती. घरात तो आणि त्याची वयोवृध्द आई असे दोघेच राहत होते. विनायक प्रवाशी रिक्षा वहातुक करताना त्याच्या रिक्षात नेहमी भाडेकरू म्हणून एक विवाहित महिला बसत ...पान ६ वर

## फुलवालीच्या मागे लागला होता फुलवला अश्लील मॅसेज पाठवताच त्याचा घात झाला



मुंबई/एस.कुमार

काही लोक इतके लंपट असतात की एखाद्या महिलेने त्यांना भाव दिला नाही तरी ते तिच्या मागे लागतात आणि तिला नाहक त्रास देतात. काही लोक याला एकतर्फी प्रेम म्हणतात. पण हे एकतर्फी प्रेम नसते तर शारीरिक आकर्षण असते. पण अशावेळी जर एखाद्या पुरुषाने महिलेला जास्तच त्रास देण्याचा प्रयत्न केला तर ती कुठल्याही थराला जाऊ शकते. दादरच्या फूल मार्केटमध्ये दामोदर पगडे यांचा फुलांचा स्टॉल आहे. तिथेच सुप्रिया वाघमारे या महिलेचाही स्टॉल आहे. मात्र दामोदर सुप्रियाच्या मागे लागला होता. अश्लील हावभाव करणे, शेरेबाजी करणे असे प्रकार सुरु होते. ...पान ६ वर

## सराईत गुन्हेगारांना पैशांचा मोह फार ड्रायव्हरने केले त्याच्या मालकाला ठार





वसई/क्राईम रिपोर्टर

**कोणत्याही व्यक्तीला कामावर ठेवताना त्याची संपूर्ण माहिती घ्या असे पोलीस वारंवार सांगत असतात, पण लोक त्याच्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे काही गुन्हेगारी पार्श्वभूमीचे लोक नोकरीच्या निमित्ताने एखाद्या श्रीमंत व्यक्तीच्या घरात प्रवेश मिळवतात आणि त्याची संपूर्ण माहिती घेतात. त्यानंतर आपल्या साथीदारांच्या मदतीने मालकाचे घरदार लुटून त्याची हत्या करून फरार होतात. विरारमध्ये अशाच एका गुन्हेगाराला पेट्रोल पंप मालक रामचंद्र काकराणी यांनी ड्रायव्हर म्हणून कामाला ठेवले, पण तो सराईत गुन्हेगार असल्याचे काकराणी ठाऊक नव्हते आणि याच ड्राव्हरने आपल्या साथीदारांच्या मदतीने काकराणीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

अपहरण केलेल्या ७५ वर्षीय वयोवृद्ध पेट्रोल पंप चालकाच्या हत्येचा उलगडा करण्यात १६ दिवसांनी युनिट दोन आणि मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पथकाला यश मिळाले आहे. ...पान ६ वर

**पान १ वरून...**

## घरात गणपती असताना भयानक ...

हनुमंत हा गवंडी काम करायचा तर मदन पाटील याची पत्नी अनिशा या तेथे आरोग्य विभागात आशा सेविका म्हणून काम करीत होत्या. जैतू पाटील यांनी बांधलेले घर हे मदन जैतू पाटील यांचे नावे होते. त्यामुळे वडिलांनी बांधलेल्या घराचा अर्धा भाग आपल्या नावावर करून देण्यात यावा यासाठी हनुमंत हा आपला भाऊ मदन सोबत सातत्याने वाद घालत होता. यावर्षी त्यांच्या घरात पहिल्यांदा गणपती बाप्पाचे आगमन झाले होते, मात्र हनुमंत जैतू पाटील याने आपल्या पत्नीला माहेरी भडवळ येथे पाठवून दिले होते. सात सप्टेंबरच्या रात्री त्या दोन्ही भावांमध्ये वाद झाल्याचे बोलले जात होते. सकाळी दहा वाजता नेरळ कळंब रस्त्यावरील नाल्यात विवेक मदन पाटील या दहा वर्षाच्या मुलाचा मृतदेह आढळून आला. स्थानिकांनी त्यानंतर त्या मुलाच्या आईबाबांची चौकशी करण्यास सुरुवात केली असता त्याच नाल्यात अनिशा मदन पाटील यांचा मृतदेह आढळून आला. त्यानंतर ग्रामस्थांनी या कुटुंबाच्या घराकडे धाव घेतली. घरी गेल्यावर सर्वांना धक्का बसला आणि घरात मदन जैतू पाटील यांचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळून आला. तोपर्यंत नेरळ पोलीस तेथे पोहचले होते. घटनास्थळी काही वेळाने पोलीस उप अधीक्षक धूळदेव टेले हे देखील पोहचले. सर्व तिन्ही मृतदेह पोलिसांनी शव विच्छेदन करण्यासाठी कर्जत येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवले असून या घटनेचा तपास नेरळ पोलीस करीत आहेत.नेरळ पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी त्या घरातील चौथा सदस्य असलेल्या हनुमंत जैतू पाटील यास संशयित म्हणून चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. या घटनेने कर्जत तालुका हादरला असून याच पोशीर पाडा मध्ये आठ वर्षापूर्वी कर्जत येथील तरुणाचा खून अनैतिक संबंध यातून झाला होता आणि आजच्या घटनेने त्या खुनाच्या प्रकरणाला पुन्हा उजाळा मिळाला आहे. मृत महिला अनिशा या सात महिन्यांच्या गरोदर आहेत. तसेच त्या स्थानिक पातळीवर पोशीर ग्रामपंचायत मध्ये आरोग्य विभागाच्या आशा सेविका म्हणून सेवा देत होत्या. अनीशा मदन पाटील यांचे माहेर हे याच चिकणपाडा गावापासून दीड किलोमिटर अंतरावरील माले गावातील आहे. त्या मृत विवाहितेचा भाऊ रुपेश यांनी नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून त्यात त्यांनी अर्धे घर नावावर करीत नाही म्हणून हनुमंत जैतू पाटील यानेच त्या तिघांना ठार केले असल्याचा दावा केला आहे. या प्रकरणाचा उलगडा शव विच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यावर होण्याची शक्यता आहे.

## संशयाच्या भुताने पतीला घेरले...

नववीत शिकते. दरम्यान राठोड पत्नीच्या चारित्र्यावर संशय घ्यायचा त्यातून दोघांची नेहमी भांडणे व्हायची. १३ सप्टेबरला गोपालची पत्नी भारती सकाळी ४ वाजता उठली आणि कामावर जाण्याची तयारी करू लागली. मात्र त्याच वेळेस गोपाळबरोबर तिचे भांडण झाले. या भांडणात चिडलेल्या गोपाळने भारतीला चाकूने भोसकले. दरम्यान आई-वडिलांच्या भांडणाने मुलीला जाग आली आणि ती उठली. तोवर गोपाळने भारतीला भोसकले होते, ती रक्ताच्या थारोळ्यात पडताच मुलीने आरडा ओरडा करून बापाला पकडण्याचा प्रयत्न केला, पण तो पळून गेला. त्यानंतर मुलीची ओरड एकूण शेजारी धावले. त्यांनी जखमी भारतीला संजीवनी रुग्णालयात नेले, मात्र तिचा मृत्यू झाल्याच डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची माहिति पोलिसांना समजताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन चौकशी सुरु केली. वरिष्ठांचा आदेशानुसार पोलीस निरीक्षक विजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु केला आणि अवघ्या ६ तासात मुळ गावी पाळण्याच्या तयारीत असलेल्या आरोपी गोपाळला डोंबिवली येथून पोलिसांनी अटक केली.

## २ लाखांची सुपारी देऊन साधला...

चारित्र्यावर संशय घेते म्हणून ती ही तिच्यावर चिडत होती. भांडणात ती तिला म्हणत होती की, तुमचा मुलगा मला माझ्या ऐन जवानीत सोडून गेला त्यात माझा काही दोष? मी कशाला माझे मन मारून राहू मला ही मन आहे, सेक्सची भावना आहे आणि तो माझा अधिकार आणि हक्क आहे असे ती सासुला ठणकावून सांगून गप्प बसवित होती. अलिकडे सासु सूनेची भांडणे ही पै-पाहुण्यापर्यंत पोहचली होती. बऱ्याच वेळेला त्यांनी मध्यस्थी करून ती मिटवली ही होती. परु ही भांडणे मिटविताना पाहुणे ही सासु स्मिता याची बाजु घेत असल्याचे सुन वैशालीच्या लक्षात येत होते. त्यामुळे ती पाहुण्याच्यासमोर सासुला काही बोलत नव्हती. परंतु ते गेले की, परत तिचे तुणतुणे सुरू असायचे. वैशालीचे माहेर हे मध्यप्रदेशातील पांढुरणे येथील होते. ती तिकडे सारखे कोणते ना कोणते कारण काढून जात होती. आपल्या माहेरी गेली आठ दहा दिवस ती तिकडेच राहत होती. त्यामुळे तिच्या सासुला तिचे लफडे हे तिच्या माहेरकडच्या कुठल्या तरी तरूणाबरोबर आहे अशी शंका येत होती. वैशाली ही माहेरहून परत आली की त्या दोघीची भांडणे ही ठरलेली असायची. वैशाली ही तिला माझ्या नावे सगळी प्रॉप्रटी करा म्हणून सांगायची तर तिची सासु ही तुझे बाहेर कोणाबरोबर लफडे आहे त्यामुळे मी काही तुझ्या नावे प्रॉप्रटी करणार नाही असे म्हणायची. या कारणातून त्या दोघीची भांडणे विकोपला गेली होती. एकदा दोनदा सासुने वैशालीला मोबाईलवरून कुठल्या तरी परपुरूषाबरोबर बोलत असताना तिने त्या दोघांचे संभाषण ही ऐकले होते. त्यामुळे तिची आता खात्रीच झाली होती. सुन वैशाली ही परपुरूषाच्या नादाला लागलेली असून ती काही आपली प्रॉप्रटी ठेवीत नाही. आपल्या कडून प्रॉप्रटी काढून घेऊन ती त्या पुरूषाबरोबर पळुन गेली की आपण रस्त्यावर येवू असे तिला वाटत होते.त्यामुळे त्या आता जास्तच विचार करीत होत्या. आपले आपल्या सुनेबरोबर कधी पटत नाही. ती सारखी आपल्या बरोबर भांडत असते हे स्मिता यांनी आपला भाऊ भगवान मेढें याना सांगितले होते. त्याने ही आपल्या बहिणीची बाजु घेत वैशाली हिला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचे सांगणे हे पालथ्या घड्यावरचे पाणी होते. त्या दोघीना कुणी किती ही सांगितले तरी त्याच्यातील भांडण काही कमी होत नव्हते. उलट त्या दोघीची भांडणे विकोपला जाऊन वाढतच होती.अशातच वैशालीने आपल्या सासुचा कायमचा काटा काढण्याचा विचार केला. तिला कायमचे संपविण्यासाठी तिने आपल्या दोन चुलत भावांना सांगितले. त्यासाठी तिने त्यांना दोन लाख रूपयांची सुपारी ही दिली. कारण तिला माहिति होते की, तिचे दोन्ही भाऊ हे पैशासाठी काही ही करायला तयार आहेत. याच संधीचा फायदा घेत तिने आपल्या दोन्ही चुलत भावांना सासुला मारण्याची सुपारी दिली. दि.२५ ऑगस्ट रोजी वैशालीने आपल्या शेजारी राहणाऱ्या बाईकडून मोबाईल घेतला.त्या मोबाईलवरून ती आपल्या भावाशी बोलली. बोलता बोलता तिने शेजारणीला विचारून तिच्या मोबाईलवरून आपल्या भावाच्या खात्यात दहा हजार रूपये ट्रान्स्फर केले.त्या दिवशी तिने मुद्दामच सासु बरोबर रोजच्या प्रमाणे भांडण काढून संपती विषयी वाद घातला. जोपर्यंत प्रॉप्रटी माझ्या नावे करीत नाही तो पर्यत मी तुला सोडणार नाही असे ती त्यांना म्हणाली होती. सासुने ही तिला जशास तसे उत्तर दिले होते. त्यावेळी त्या दोघीची भांडणे शेजाऱ्यांनी सोडविली होती. त्यानंतर तिने दुसऱ्या दिवशी म्हणजे २६ ऑगस्ट रोजी पांढुरण्याहून आपल्या दोन्ही भावांना रात्रीच्या वेळी आपल्या घरी मागील दरवाज्याने बोलावून आत घेतले. त्यावेळी तिची पाच वर्षाची मुलगी दुसऱ्या खोलीत झोपली होती तर तिची सासु तिच्या खोलीत बेडवर शांत झोपली होती. वैशालीने त्या दोघांना घेऊन सासुच्या खोलीत गेली. तिच्या एका भावाने झोपलेल्या स्मिता राऊत याचे पाय गच्च धरले. तर दुसऱ्याने त्याचा गळा जोरात आवळून धरला. तशा स्मिता यांना जाग आली. समोर आपल्या सुनेला आणि तिच्या दोन्ही भावांना बघुन त्या जोर जोरात ओरडयला सुरूवात केली त्यावेळी वैशाली ही सासु स्मिता याच्या छातीवर बसली आणि तिने सासुचे हात घट्ट धरले. त्यावेळी वैशाली आणि तिच्या एका भावाने स्मिता याचा गळा जोरात आवळला. त्या दोघाच्या ताकदीपुढे वयोवृध्द स्मिता या हतबल झाल्या. त्याचा श्वास गुदमरला गेला. जागीच त्याचा मृत्यू झाला. सासुचे काम तमाम झाल्यावर वैशालीने आपल्या दोन्ही भावांना कुणी पाहणार नाही अशा बेताने घराबाहेर काढले. दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी वैशालीने जोर जोरात रडत आपली सासु आपल्याला सोडून गेल्याचे सांगत रात्री त्यांना जोरात हार्टअॅटक आल्याचे सांगितले. स्मिता राऊत या हार्ट अॅटकने गेल्याचे तिने पै-पाहुण्यांना आणि सासुचा भाऊ भगवान मेंढे यांना कळविले. पै-पाहुणे आल्यावर अंत्यसंस्काराचा कार्यक्रम आटोपण्यात आला. घरात सगळीकडे रडारड सुरू असताना भगवान मेंढे यांनी वैशालीची लहान मुलगीबरोबर बोलत असताना त्या लहान मुलीने भगवान मेंढे याना काल रात्री आजीच्या खोलीत आपले दोन्ही मामा आणि आपली आई असल्याचे सांगितले. त्यांनी आजीला मारहाण केल्याचे ही तिने सांगितल्यावर मेंढे याची शंका वाढली. यात काही तरी गोम आहे हे त्यांनी ओळखले. त्यांनी शेजारी पाजाऱ्याकडे चौकशी केली असता त्यांनी ही भगवान मेंढे याना घटनेच्या रात्री सासु सुनेची भांडणे झाल्याची सांगितले. भगवान मेंढे याना शंका आल्याने त्यांनी या घटनेची माहिति अजनी पोलीसाना दिली. पोलीसांनी या घटनेची माहिति घेत सुन वैशाली राऊत यांना ताब्यात घेतले. पोलीसांनी तिचा मोबाईल चेक केला असता घटनेच्या रात्री व आदल्या रात्री वैशालीचे तिच्या दोन्ही भावासोबत बोलणे झाल्याचे दिसून आले. ते बोलणे काय आहे याचे कॉल रेकॉर्ड ही पोलीसांनी काढले असता स्मिता राऊत याच्या खूनाचे गुढ पोलीसांना उकलून काढण्यात यश आले. सुरूवातीला वैशाली राऊत हिने पोलिसांना आपल्या सासुचा मृत्यू हा हार्ट अॅटकने झाला असल्याचे सांगितले. परंतु पोलीसांनी मयत स्मिता राऊत याचा शवविच्छेदनाचा व्हिसेरा मिळाला होता. त्यात मयताचा गळा आवळून श्वास गुदमरल्याने मृत्यू असा उल्लेख असल्याने पोलीसांना वैशालीवरील संशय बळावला. महिला पोलीसाकरवी तिला बोलते केले असता तिने शेवटी आपला गुन्हा कबुल केला. गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती तिने पोलीसाना दिली. तिच्या सांगण्यावरून पोलीसांनी या गुन्हयातील तिच्या दोन्ही चुलत भावांना ही ताब्यात घेतले. त्यांनी ही पोलीसांना सांगितले की, वैशाली राऊत हिने तिच्या सासुला मारण्यासाठी त्यांना दोन लाख रूपयाची सुपारी दिली होती. त्यांनी आपला गुन्हा कबुल केल्यावर या घटनेची लेखी फिर्याद मयत स्मिता राऊत याचा भाऊ भगवान मेंढे याच्याकडून घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अजनी पोलीसांनी स्मिता ओकार राऊत (वय ५४) याच्या खून प्रकरणी तिची सुन वैशाली राऊत (वय २८) आणि तिच्या दोन्ही भावाविरूध्द भा.दं.वी. कलम १०३(१)(३) प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना मा. न्यायालयासमोर उभे केले असता मा. न्यायालयाने या तिघांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.सासु सुनेचे कधीच एकमेकीशी पटत नाही.त्याच्यातील भांडणे वाद विवाद हे टोकाला गेले की त्यातून खूनासारखी अघटित अशी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## दारुड्या पतीने छळ केला फार...

रविवारी सायंकाळी त्यांच्यात वाद झाले. हिराने चाकूने पती किरपावर वार केले. या घटनेत तो गंभीर जखमी झाला. पोलिसांनी या घटनेची माहिती मिळाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राघवेंद्र क्षीरसागर यांनी घटनास्थळी भेट दिली. किरपाला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. त्याची पत्नी हिराला रात्री उशीरा ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## ओळखीच्या माणसाने विश्वासघात...

विवाहीत मुलगा समीर हा नाशिक येथे खासगी नोकरी करत होता. पुत्र प्रेमापोटी त्याआपल्या पतीसह सेवानिवृत्तीनंतर नाशिक येथेच राहू लागल्या. अधून मधून त्या जळगावला कामानिमीत्त ये जा करत होत्या. जळगाव येथील राहत्या घराची एक खोली वगळता इतर भाग त्यांनी भाड्याने दिला होता. जळगावला कामानिमीत्त आल्यानंतर मुक्कामासाठी ती खोली राखीव ठेवण्यात आली होती. सेवानिवृत्तीनंतर स्नेहलता यांचे सुखाचे दिवस सुरु होते. त्यांचा सर्वाधिक वेळ नाशिक येथे मुलगा, सुन आणि पतीसोबत व्यतीत होत असे. त्या जळगाव येथील सरकारी नोकरांच्या सहकारी पतपेढीच्या सभासद होत्या. या पतपेढीची १८ ऑगस्ट २०२४ रोजी नुतन मराठा महाविद्यालयात बैठक होती. त्या बैठकीसाठी स्नेहलता चुबळे या १७ ऑगस्ट रोजी नाशिक येथून जळगावला येण्यासाठी निघाल्या होत्या. १८ ऑगस्ट रोजी त्यांनी ग. स. सोसायटी अर्थात सरकारी नोकरांच्या सहकारी पतपेढीच्या बैठकीला हजेरी लावली. सेवानिवृत्तीनंतर त्यांना मिळालेल्या तिस लाख रुपयांची त्यांनी रिंगरोडवरील स्टेट बँकेच्या कृषी विकास शाखेत एफडी ठेवली होती. ती रक्कम त्यांना काढायची होती. मोठी रक्कम काढायची असल्यास बँकेला आगावू सुचना द्यावी लागते. त्यामुळे त्यांनी १९ ऑगस्ट रोजी बँकेत जावून आपणास तिस लाख रुपयांची रक्कम विड्रॉल करायची असल्याबाबत सुचना दिली. स्नेहलता चुबळे यांना नाशिक येथे एक फ्लॅट घ्यायचा होता. त्यासाठी त्यांना तिस लाख रुपयांची रक्कम नाशिक येथे घेऊन जायची होती. स्क्हेलता चुबळे या परिचारिका म्हणून साळवा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातकार्यरत असतांना त्याठिकाणी जिजाबराव अभिमन्यु पाटील नावाचा लिपीक काम करत होता. जिजाबराव पाटील हा लिपिक संघटनेचा जिल्हाध्यक्ष देखील होता.एकाच ठिकाणी दोघांची सेवा झालेली होती. त्यामुळे साहजीकच दोघांची ओळख होती. सेवानिवृत्तीच्या वेळी व नंतर देखील जिजाबराव पाटील याने स्नेहलता यांना वेळोवेळी कार्यालयीन कामात मदत केली होती. त्यामुळे त्यांचा जिजाबराव पाटील याच्यावर विश्वास होता. स्नेहलता चुबळे यांना नाशिक येथे फ्लॅट घ्यायचा आहे आणि त्यासाठी जळगावला आल्यानंतर त्या बँकेत तिस लाख रुपयांची रक्कम घेण्यासाठी जाणार असल्याचे जिजाबराव यास माहित होते. रक्कम मोठी असल्यामुळे बँकेत मदतीसाठी स्नेहलता चुबळे यांनी जिजाबराव यास मदतीसाठी बोलावले होते. तिस लाख रुपयांची भलीमोठी रक्कम घेऊन स्नेहलता चुबळे या नाशिकला जाणार असल्याची माहिती समजल्यानंतर जिजाबरावच्या मनात कुविचाराने थैमान घालण्यास सुरुवात केली. लाखो रुपये लबाडीने आपल्याला मिळाले तर आपले भले होईल असा कुविचार त्याच्या डोक्यात घोळू लागला. आजवर स्नेहलता चुबळे यांनी जिजाबराव पाटील याच्यावर खुप विश्वास टाकला होता. या विश्वासातूनच त्यांनी जिजाबराव यास केवळ विड्रॉलच्या वेळी बँकेत मदतीसाठी बोलावले होते. मात्र त्याने लागलीच एक प्लॅन आखला. या प्लॅनमधे त्याने त्याचा साथीदार विजय रंगराव निकम यास सहभागी करुन घेतले. विजय रंगराव निकम हा देखील जिल्हा परिषद कर्मचारी होता. तो अमळनेर येथील बांधकाम विभागात लिपिक म्हणून काम करत होता. तो लिपिक संघटनेचा उपाध्यक्ष होता. अशा प्रकारे लिपिक संघटनेचा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष असे दोघे जण एकत्र आले. दोघेही अमळनेर येथील रहिवासी होते. २० ऑगस्टचा दिवस उजाडला. ठरल्यानुसार या दिवशी स्नेहलता चुबळे या बँकेत आल्या. जिजाबराव हा देखील त्याची चारचाकी क्रेटा गाडी घेऊन बँकेत प्रकट झाला. त्याने त्याचा साथीदार विजय निकम याला सोबत आणले होते. मात्र तो बँकेत न येता गाडीतच बसून राहीला. ठरल्यानुसार तिस लाख रुपयांची रक्कम विड्रॉल झाली. यावेळी जिजाबरावने स्नेहलता यांना मदत केली. त्यानंतर त्यांनी जिजाबराव यास मी रिक्षाने घरी जाते व नंतर तेथून नाशिकला जाते असे म्हटले. मला फक्त रिक्षा ठरवून द्या असे तिने जिजाबरावला म्हटले. मात्र कुविचार डोक्यात ठेवून असलेल्या जिजाबरावने त्यांना म्हटले की मला मिटींगसाठी उद्या नाशिकला जायचे आहे. मी तुम्हाला सोडून देतो. तुम्ही माझ्या कारमधे बसा. जिजाबरावने सारखी सारखी गळ घातल्यामुळे इच्छा नसतांना मात्र तरीदेखील केवळ विश्वासावर त्या त्याच्या कारमधे बसल्या. कारमधे अगोदरच पुढच्या सिटवर विजय रंगराव निकम बसलेला होता. तो स्नेहलता चुबळे यांच्यासाठी अनोळखी होता. वाटेत खोटे नगर नजीक स्नेहलता यांनी त्यांच्या घरापासून काही अंतरावर जिजाबराव यास गाडी उभी करण्यास सांगितले. तिस लाख रुपयांची पिशवी सोबत घेऊन त्या पायी पायी घरी गेल्या. घरी गेल्यानंतर त्यांनी घरगुती सामानाची अजून एक पिशवी सोबत घेतली. त्यानंतर लागलीच त्या पुन्हा गाडीत येऊन बसल्या. त्यानंतर एरंडोल, पारोळा मार्गे तिघे जण नाशिकला जाण्यास निघाले. वाटेत पारोळा गेल्यानंतर स्नेहलता यांनी पती संजय यांना सव्वा सात वाजेच्या सुमारास फोन केला. तो त्यांचा पतीसोबत अखेरचा कॉल ठरला. माझे जळगावचे काम झाले असून मी रात्री अकरा वाजेपर्यत नाशिकला येत आहे. तुम्ही मला घेण्यासाठीस्टेशनवर या असे स्नेहलता यांनी त्यांच्या पतीसोबत अखेरचे बोलणे केले. त्यानंतर पुढे जिजाबराव पाटील आणि विजय निकम यांच्याकडून आपली हत्या होणार असल्याची पुसटशी देखील कल्पना स्नेहलता चुबळे यांना आली नाही. पतीसोबत त्यांचा तो अखेरचा कॉल होता. एरंडोल, पारोळा ही दोन्ही गावे गेल्यानंतर पुढे धुळे मार्गे न जाता पारोळ्यानंतर विचखेडा गावापासून नाशिकला जाणाऱ्या रस्त्याचा जिजाबरावने वापर केला. दरम्यान मागच्या सिटवर बसलेल्या स्नेहलता यांना डुलकी लागण्यास सुरुवात झाली. रात्रीचा अंधार आणि गार वारा लागत असल्यामुळे त्यांना लवकरच झोप लागली. स्नेहलता चुबळे यांना झोप लागली या संधीचा फायदा घेत आर्वी गावानजीक दोघांनी स्नेहलता यांचा मोबाईल बंद करुन टाकला. पुढे काही अंतर गेल्यानंतर जिजाबरावने गाडी उभी केली. याठिकाणी दोघांनी मिळून स्नेहलता यांचा त्यांच्याचस्कार्फने गळा आवळण्यास सुरुवात केली. झोपेतच त्यांची गळा दाबून हत्या करण्यात आली. ती त्यांची काळरात्र ठरली. गाडीतील दोघांनी सोबत गोणपाट आणि सुतळी अशा वस्तू आवर्जून हेतूपुर्वक आणल्या होत्या. निर्जन ठिकाणी गाडी उभी करुन दोघांनी मिळून स्नेहलताचा मृतदेह गोणपाटात टाकला. गोणपाट सुतळीने बांधून बंद केले. आजवर स्नेहलताने जिजाबराव याच्यावर टाकलेला विश्वास केव्हाच संपला होता. निव्वळ तिस लाखांच्या रकमेसाठी जिजाबरावने त्याचा साथीदार विजयच्या मदतीने स्नेहलतायांची हत्या केली. स्नेहलताच्या विश्वासाची जिजाबरावने काहीच किंमत केली नाही. त्यानंतर आर्वी गावापासून मालेगाव, शिरुड चौफुलीअशा रस्त्याने टोलनाका वाचवत दोघांनी मयत स्नेहलताच्या मृतदेहाचे गोणपाट सोबत घेत धुळे शहराच्या दिशेने मार्गक्रमण सुरु केले. आपण टोल नाक्याच्या सिसीटीव्ही फुटेजमधे दिसू नये यासाठी त्यांनी टोल नाका वाचवत वाचवत मार्गक्रमण करत चाळीसगाव चौफुलीमार्गे धुळे गाठले. त्यानंतर फागणे-अमळनेर मार्गे शिरपूर महामार्गावरील तापी नदीचा पुल गाठला. त्यावेळी रात्रीचे सुमारे साडेदहा ते अकरा वाजेची वेळ होती. सततधार सुरु असलेला पाऊस थांबण्याचे नाव घेत नव्हता. तापी नदीच्या पात्रापासून सुमारे अडीचशे फुट उंचीच्या पुलावरुन भर पावसात दोघांनी स्नेहलताच्या मृतदेहाचे सुतळीने बांधलेले पोते नदीच्या ओसंडून वाहणा-या प्रवाहात फेकून दिले. दोघांजवळ जराही दयामाया उरली नव्हती. केवळ तिस लाखांसाठी ते मानवी रुपातील राक्षस बनले होते. तिस लाखांची बॅग वगळता स्नेहलता चुबळे यांच्याजवळ असलेली पर्स, मोबाईल आणि घरगुती सामानाची पिशवी असे साहित्य देखील दोघांनी नदीच्या प्रवाहात फेकून दिले. तेथून यु टर्न घेत दोघांनी नरडाणा मार्गे अमळनेरच्या दिशेने गाडी हाकली. दोघेही अमळनेरचे रहिवासी होते. अमळनेर गावाच्या बाहेर गाडी उभी करुन दोघांनी प्रत्येकी पंधरा पंधरा लाखाची रक्कम वाटून घेतली. त्यानंतर जणू काही झालेच नाही अशा अविर्भावात दोघांनी आपआपल्या घरी प्रवेश केला. दरम्यान रात्र उलटली तरी स्नेहलता चुबळे नाशिकला पोहोचल्या नाही, त्यांचा फोनदेखील बंद येत होता म्हणून त्यांचे पती व मुलगा असे दोघेजण हैराण झाले. दुसऱ्या दिवशी २१ ऑगस्ट २०२४ रोजी स्नेहलता यांचे पती व मुलगा समीर या दोघांनी जवळपासचे मित्र व नातेवाईक यांच्याकडे फोन करुन त्यांची विचारपुस केली. मात्र कुणाकडेही स्नेहलता आलेल्या नव्हत्या. त्यामुळे दोघा पिता पुत्रांच्या बेचैनीत अजूनच भर पडली. दरम्यान स्नेहलता यांची मुलगी मयुरी हिला तिच्या धरणगाव तालुक्यातील चांदसर येथील मामांकडून समजले की तिच्या आईला नाशिक येथे फ्लॅट घ्यायचा होता. तो फ्लॅट घेण्यासाठी स्नेहलता यांनी जळगाव येथील रिंगरोड परिसरातील स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या कृषी विकास शाखेतून तिस लाख रुपयांची रक्कम २० ऑगस्ट रोजी काढली होती. ती रक्कम काढतांना मदतीसाठी त्यांच्यासोबत जिजाबराव पाटील हा हजर होता. त्यानंतर २२ ऑगस्ट रोजी पुन्हा दोघा पिता पुत्रांनी मिळून स्नेहलता यांचा शोध घेतला. परंतू त्यांचा कुठेही शोध लागला नाही. त्यामुळे दोघा पिता पुत्रांनी सोबतच जळगाव तालुका पोलिस स्टेशन गाठत आपली कैफीयत मांडली. सुरुवातीला या घटनेप्रकरणी मिसींग दाखल करण्यात आली. ६१/२०२४ या क्रमांकाने २३ ऑगस्ट २०२४ रोजी दाखल करण्यात आलेल्या या मिसींगचा पुढील तपास हे.कॉ. अनिल मोरे यांच्याकडे देण्यात आला. जळगाव तालुका पोलिस आपल्या पातळीवर या मिसींगचा तपास करत होते. स्नेहलता यांचे पती व मुलगा असे दोघेजण देखील त्यांच्या पातळीवर याबाबत सर्वत्र चौकशी करत होते. बेपत्ता स्नेहलता चुबळे यांचा मुलगा समीर, पती संजय, मुलगी मयुरी आदींनी थेट जिजाबराव पाटील याची भेट घेत त्याला तुम्ही स्नेहलता यांच्यासोबत बॅकेत गेले होते का अशी विचारणा केली. त्यावर जिजाबराव याने त्यांना सांगितले की मी २० ऑगस्ट रोजी स्नेहलता यांच्यासोबत बँकेत गेलो होतो. त्यांना तिस लाख रुपयांची रक्कम काढण्याकामी मदत केली. त्यानंतर मी त्यांना रोख रकमेच्या बॅगसह रिक्षात बसवून दिले. त्यानंतर पुढचा घटनाक्रम आपल्याला माहिती नाही असे त्याने सर्वांना सांगितले. त्यानंतर सर्वजण खोटे नगर येथील त्यांच्या घराचे भाडेकरी किरण गोसावी यांच्या आईची भेट घेण्यासाठी गेले. किरण गोसावी यांच्या आईने समीर यास सांगितले की तुझी आई २० ऑगस्टच्या सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास घरी आली होती. मात्र मला लागलीच जायचे आहे असे सांगून लगेच निघून गेली होती. त्यानंतर पुन्हा सर्वांनी जळगाव तालुका पोलिस स्टेशन गाठत मिसींगचा तपास करणाऱ्या हे.कॉ. अनिल मोरे यांची भेट घेतली. हे.कॉ. अनिल मोरे यांनी संबंधीत स्टेट बँकेच्या शाखेत जावून २० ऑगस्ट या तारखेचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यात त्यांना कॅश काऊंटरवरुन पैसे घेतांना स्नेहलता आणि त्यांच्यासोबत जिजाबराव पाटील असे दोघे जण दिसून आले. स्नेहलता यांच्या मोबाईलचे लोकेशन पारोळा दिसून आल्याने त्याठिकाणी देखील तपास करण्यात आला. मात्र त्यात काही निष्पन्न झाले नाही. बघता बघता मिसींग दाखल होऊन दहा दिवसांचा कालावधी उलटला. मात्र मिसींगचा तपास पुढे सरकत नव्हता. अखेर स्नेहलता चुबळे यांच्या पती व मुलाने पोलिस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांची भेट घेत आपली व्यथा आणि घातपाताची शंका कथन केली. विषय गंभीर असल्याचे डॉ. रेड्डी यांच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही. त्यांनी अजिबात वेळ न दवडता समांतर तपासाची सुत्रे स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. बबन आव्हाड यांच्याकडे सोपवली. पो.नि. बबन आव्हाड यांनी तातडीने गुणवत्ताधारक माहितगार कर्मचाऱ्यांचे एक पथक तयार केले. या पथकात सहायक फौजदार विजयसिंग पाटील, हे.कॉ. सुधाकर अंभोरे, हे.कॉ.जितेंद्र पाटील, अकरम शेख, महेश महाजन, लक्ष्मण पाटील, पोलिस नाईक राहुल पाटील, भारत पाटील आदींचा समावेश करण्यात आला. या पथकाने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कसून तपास सुरु केला. संशयाची सुई असलेल्या जिजाबराव पाटील यास चौकशीकामी बोलावून त्याची सखोल चौकशी केली. त्यावेळी जिजाबराव याने मी बँकेत स्नेहलता यांच्या सोबत पैसे काढतांना सोबत होतो आणि त्यानंतर त्यांना घरी खोटे नगरपर्यंत सोडल्याचे सांगितले. यापुर्वी स्नेहलता यांच्या मुलाला त्याने म्हटले होते की मी त्यांना रिक्षात बसवून दिले होते. अशा प्रकारे वेगवेगळे वक्तव्य त्याने केले. त्याचे बोलणे संशयास्पद आणि बोलण्यात तफावत आढळून आल्याने त्याच्या मोबाईलचे कॉल डीटेल्स काढण्यात आले. त्याच्या मोबाईल कॉल डीटेल्समधे त्याचे विजय निकम याच्यासोबत सर्वाधिक बोलणे झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्याला स्वतंत्रपणे चौकशीकामी बोलावण्यात आले. त्याने वेगळीच स्क्रिप्ट पोलिस पथकला कथन केली. दोघांच्या बोलण्यात तफावत असल्याचे पोलिस पथकाच्या लक्षात आले. संशयाची सुई जिजाबराव अभिमन्यु पाटील आणि विजय रंगराव निकम यांच्याकडे फिरु लागली. ३० लाख रुपयांच्या लालसेपोटी स्नेहलता चुबळे यांचा घातपात केला असल्याच्या संशयाखाली दोघांविरुद्ध जळगाव तालुका पोलिस स्टेशनला हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. स्नेहलता चुबळे यांचा मुलगा समीर संजय देशमुख याने दिलेल्या फिर्यादीनुसार गु.र.नं. ३१२/२०२४ प्रमाणे भारतीयन्यायसंहिता २०२३ कलम १०३(१),६१(२),२३८,३(५) प्रमाणेहा गुन्हा दाखल करण्यात आला. जिजाबराव अभिमन्यु पाटील व विजय रंगराव निकम यादोघांनी स्नेहलता संजय चुंबळे यांच्या जवळ असलेल्या तिस लाख रुपयांच्या रकमेच्या लालसेपोटी घातपात करुन त्यांना जिवे ठार करुन त्यांच्या मृतदेहाची कुठेतरी विल्हेवाट लावल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेने दोघा संशयीत आरोपींना अटक केली. दोघांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने दोघांना ११ सप्टेबर पर्यत पोलिस कोठडी सुनावली. पोलिस कोठडी दरम्यान दोघांनी आपला गुन्हा कबुल केला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोघांची सखोल चौकशी, सीसीटीव्ही फुटेजची तपासणी, संशयीतांचे कॉल डिटेल्स आदी बाबी व्यवस्थित हाताळल्या. मासेमारी करणाऱ्या पथकाच्या माध्यमातून स्नेहलता चुबळे यांच्या मृतदेहाच्या पोत्याचा आणि त्यांच्या वस्तूंचा घटनास्थळावरील नदी पात्रात शोध लावला जात आहे. मासेमारी करणाऱ्या पट्टीच्या पोहणाऱ्यांच्या मदतीने स्नेहलता यांचा मृतदेह हुडकून काढण्याचे कसोशीने प्रयत्न सुरु असून मृतदेह शोधून देणाऱ्यांना योग्य ते बक्षीस दिले जाईल असे त्यांना सांगण्यात आले आहे. पोलिस कोठडीदरम्यान दोघा संशयीतांनी गुन्ह्यात वापरलेली कार आणि दोघांनी अर्धे अर्धे वाटून घेतलेले एकुण तिस लाख रुपये हस्तगत करण्यात आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेने या गुन्ह्याचा शोध लावला. पुढील तपास जळगाव तालुका पोलिस स्टेशनचे पो.नि. महेश शर्मा व त्यांचे सहकारी पोलिस उपनिरीक्षक नयन पाटील, गणेश साईकर, पोलिस हेडकॉन्स्टेबल प्रवीण पाटील, केतन पाटील आदी करत आहेत. मोह हे दुःखाचे कारण असते. मोहात पडलेल्या मनुष्याच्या नशीबी कोणत्या ना कोणत्या रुपाने दुखः येते. एखाद्यावर अती विश्वास टाकणेहा घटक देखील दुःखास कारणीभूत ठरतो. त्यासाठी मोह आणि परक्यावर अती विश्वास टाकणेया दोन गोष्टी मनुष्याने लक्षपुर्वक करायला हव्या असे या घटनेच्या निमीत्ताने सांगावेसे वाटते. जिजाबराव पाटील आणि विजय निकमया दोघांना तिस लाख रुपयांचा मोह झाला. आणि या मोहातूनच त्यांच्या हातून गुन्हा घडला. मयत बेपत्ता स्नेहलता चुबळे यांनी जिजाबराव पाटील याच्यावर अती विश्वास टाकला आणि हिच चुक त्यांना भोवली आणि प्राणास मुकावे लागले. जीवनभर परिचारिकेची सेवा करुन त्यांनी तिस लाख रुपये जमा केले. जिजाबराव पाटील याने त्यांना २८ लाख रुपयात नाशिकला फ्लॅट मिळवून देतो असे सांगितले असल्याचे देखील म्हटले जात आहे. त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून त्यांनी बँकेतून रक्कम काढल्याचे म्हटले जात आहे. एवढी मोठी रक्कम स्नेहलता बँकेतून काढणार असल्याची माहिती त्यांच्या पती व मुलाला माहिती नव्हती. ती माहिती परक्या जिजाबराव पाटील यास माहिती होती. अखेर त्या तिस लाख रुपयांची रक्कम बघून जिजाबरावची नियत फिरली. त्यामुळे त्याने विजय निकम याला देखील या कटात सहभागी करुन घेतले. पर्यायाने तो देखील मोहात पडला आणि गुन्ह्यात अडकला. मोहात पडणारा आणि परक्यावर अती विश्वास ठेवणारा असे दोघेही दुखा:ला आमंत्रण देत असतात.

16 TO 22 SEPTEMBER 2024 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 9/14/2024 8:51 PM Page 1



# मंद्रुप पोलीस ठाण्याचे कार्य कौतुकास्पद -पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर ग्रामीण पोलीस अंतर्गत मंद्रप पोलीस ठाणे आयोजित रक्तदान, गणराया पारितोषिक वितरण आणि वृक्षारोपण उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आली आहे. १० सप्टेंबर रोजी पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण पोलीस यांचे संकल्पनेतून मंद्रुप पोलीस ठाण्याच्या वतीने गणेशोत्सवाच्या निमित्ताने रक्तदान शिबीर, गणराया पारितोषिक वितरण, वृक्षारोपण आणि गणेश मंडळांना वृक्षवाटप या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमामध्ये पर्यावरण संरक्षण आणि समाजहिताच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण अतुल कलकर्णी यांनी आपले मनोगतातून संदेश दिली की, पोलीस ठाणे हद्दीत महिला सुरक्षा तसेच शाळा, कॉलेज येथील मुली यांची सुरक्षितता व जागृता निर्माण व्हावी, यामुळे शाळा कॉलेज मध्ये पोलीस काका, पोलीस दिदी कार्यक्रम राबविण्याबाबत तसेच तक्रारपेटी ठेवण्याबाबत संदेश दिला. तसेच गणेशोत्सव काळात पर्यावरण पुरक व सामाजहित साध्य होईल अशा वेगवेगळ्या उपक्रम राबवावे. तसेच पोलीस ठाणे हद्दीतील शेती विषयी तक्रारी बाबत बांधावर जावून वाद विवाद मिटवावे तसेच शेतकऱ्यांनी निसर्गाचे समतोल राखण्याकरिता आपल्याबांधावर व परिसरात मोठ्या प्रमाणात फळ झाडे व वृक्षारोपण करावे असे मार्गदर्शन केले.

सन २०२३ मधील गणेशोत्सव पार पाडताना समाजाहिताचे कार्यक्रम राबविणारे गणेश मंडळांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देवून गौरवण्यात आले. तसेच गणेश मंडळांना वृक्षारोपण करणेकरिता १५०० विविध प्रकारची झाडे वाटप करण्यात आले. समाजातील गरजू रूग्णांसाठी पोलीस ठाण्याच्या पुढाकाराने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. सदर वेळी गणेश मंडळाचे पदाधिकारी, गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्राम सुरक्षा दल सदस्य, पोलीस ठाणे हद्दीतील ग्राम पंचायत सदस्य, पत्रकार बंधू, पोलीस पाटील व पोलीस ठाणेकडील पोलीस अंमलदार यांनी रक्तदान केले. रक्तदान कार्यक्रमास उत्पूर्स प्रतिसाद देवून विक्रमी १८२ रक्तदात्यानी रक्तदान केले. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर तसेच सिध्देश्वर रक्तपेढी उपस्थित होते. संकेत देवळेकर उपविभागीय पोलीस अधिकारी, सोलापूर उपविभाग, सोलापूर ग्रामीण यांनी आपल्या मार्गदर्शनात वृक्षारोपण करण्याबाबतचे महत्त्व सांगितले तसेच गणेशोत्सव २०२३ मधील सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या गणेश मंडळांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. रक्तदान हे श्रेष्ठदान आहे असे मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रमास सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर उपविभाग संकेत देवळेकर, नायब तहसिलदार जितेंद्र मोरे मंद्रुप, ग्रामपंचायत सरपंच, पत्रकार बंधू, प्रतिष्ठित नागरिक, पोलीस पाटील, रक्तदाते, श्री. गणेश मंडळाचे पदाधिकारी, परीक्षक टिम, पर्यावरण दूत डॉ. मनोज देवकर, छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, रक्तपेढी, सोलापूर प्रथम प्रमुख डॉ.ऐश्वर्या मुंढे, डॉ.माधुरी जैन त्यांचे पथकातील १२ व्यक्ती, सिध्देश्वर ब्लड सेंटर, सोलापूर पथक प्रमुख डॉ. हरीशचंद्र गलीचाल त्यांचे पथकातील १० व्यक्ती व पोलीस ठाणेकडील पोलीस अंमलदार आदी उपस्थित होते. मनोज पवार मंद्रुप पोलीस ठाणे यांनी आपल्या आभार प्रदर्शनात मंद्रुप पोलीस ठाणेतील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांच्या अथक परिश्रमामुळे सदरचा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाल्याचे सांगितले, तसेच सरपंच, पत्रकार बांधव, प्रतिष्ठित नागरिक, पोलीस पाटील, रक्तदाते, श्री. गणेश मंडळाचे पदाधिकारी, परीक्षक टिम, पर्यावरण दुत डॉ. मनोज देवकर, छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, रक्तपेढी, सोलापूर प्रथम प्रमुख डॉ.ऐश्वर्या मुंढे, सिध्देश्वर ब्लड सेंटर, सोलापूर पथक प्रमुख डॉ. हरीशचंद्र गलीचाल तसेच उपस्थित नागरिक यांचे आभार मानले.

# गणपती बाप्पांचे विसर्जन करताना दोघे बुडाले; पोलिसांची समुद्रात धाव, दोघांचा जीव वाचला!



**मुंबई/प्रतिनिधी**

गणपती बाप्पा मोरया म्हणत गेल्या ७ दिवसांपूर्वी घरोघरी गणपती बाप्पा विराजमान झाले आहेत. आता, गेल्या काही दिवसांपासून मुंबईत गणपती विसर्जन सुरू झाले आहेत. दीड दिवसांच्या बाप्पांचे विसर्जन झाले असून पाच दिवसांचा गणपती, सहा दिवसांच्या गणपती बाप्पांचे विसर्जन झाल्यानंतर आज ७ दिवसांच्या गणपती बाप्पांचे विसर्जन करण्यात आले. मुंबईतील अनेक ठिकाणी, तलावात, समुद्रात आणि मुंबई महापालिकेच्या नियोजित ठिकाणीही गणपती बाप्पांचे विसर्जन करण्यात आले.

दरम्यान मुंबईतील खार पश्चिममध्ये गणपती बाप्पांच्या विसर्जनसाठी गेलेले दोन युवक पाण्यात बुडाल्याची धक्कादायक घटना घडली होती. मात्र, खार पोलिसांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे या दोन्ही युवकांचा जीव वाचला आहे. सध्या त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मुंबईच्या खार पश्चिमेकडील कार्टर रोड येथे समुद्रामध्ये बुडणाऱ्या दोन तरुणांना वाचवण्यात खार पोलिसांना यश आलं आहे. गणपती विसर्जन करण्यासाठी गेलेले दोन तरुण समुद्रात बुडत असल्याची माहिती गस्तीवर असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना मिळाली. गस्तीवर असणारे सहायक फौजदार राजू गायकवाड, पोलीस हेडकॉन्स्टेबल विकास बाबर, पोलीस शिपाई रमेश वळवी आणि पोलीस शिपाई मोकाशी यांनी स्वतः चा जीव धोक्यात घालून समुद्रात धाव घेतली. खार पश्चिम येथील समुद्रात बुडणाऱ्या दोन युवकांना पोलिसांच्या सतर्कतेमुळे वाचविण्यात आले. पोलिसांनी लवकरच त्यांना पाण्यातून बाहेर काढले, पण बेशुद्ध असल्याने त्यांना सी.पी.आर. देण्यात आला. त्यानंतर, दोन्ही युवकांना शुद्ध आली. मात्र, तात्काळ त्यांना पुढील उपचारासाठी वांद्रे येथील भाभा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. खार पोलिसांनी तत्परता दाखवत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचे नागरिकांकडून आता कौतुक होत आहे.

# वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील पथविक्रेत्यांची यादी प्रसिद्ध!



**विरार/प्रतिनिधी**

वसई विरार शहर महानगरपालिका, दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार फेरीवाल्यांना सहाय्य या उपांगा अंतर्गत वसई-विरार शहरातील स्थिर, फिरते, हंगामी व तात्पुरते फेरीवाल्यांचे सन २०१७ कालावधीत सर्वेक्षण करण्यात आले आहे. सदर सर्वेक्षण हे महाराष्ट्र शासनाने विकसित केलेल्या मोबाईल अॅपद्वारे बायोमॅट्रिक पद्धतीने करण्यात आलेले असून १५१५६ फेरीवाल्यांची सर्वेक्षणामध्ये नोंदणी करण्यात आलेली आहे. दि. १२/०९/२०२४ रोजी मा. आयुक्त महोदयांच्या अध्यक्षतेखाली शहर पथविक्रेता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत सन २०१७ मध्ये सर्वेक्षण पूर्ण झालेल्या १५१५६ पथविक्रेत्यांची यादी प्रसिध्द करणे बाबत निर्णय घेण्यात आला आहे.त्यानुसार, सदर नोंदणीकृत पथविक्रेत्यांची यादी महानगरपालिकेच्या नऊ प्रभाग समिती कार्यालयात प्रसिध्द करण्यात आली आहे. या यादीमधील तपशीलाबाबत नागरिकांना सूचना, हरकती नोंदविणेची अंतिम मुदत ३० सप्टेंबर २०२४ असून नागरिकांना आपल्या सूचना, हरकती संबंधित प्रभाग समिती कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात देता येतील.

# पालघर नगरपरिषदेला लवकरच मिळणार नवीन कार्यालय




**पालघर/प्रतिनिधी**

सण १९९८ पासून अस्तित्वात आलेल्या पालघर नगरपरिषदेला आता नवीन कार्यालय मिळणार आहे. नगर परिषदेच्या कार्यालय उभारणी मंजुरीनंतर आता इमारत उभारणीसाठी नगरपरिषदेमार्फत इच्छुक ठेकेदारांकडून निविदा मागवण्यात आल्या आहेत. कार्यालय उभारणी करता तब्बल २३ कोटी ७२ लाख रुपयांच्या जवळपासचा खर्च येणार आहे. नगरपरिषदेच्या तत्कालीन कार्यकारणीमार्फत अग्निशमन दलाच्या पाठीमागील मोकळ्या जागी नगरपरिषद कार्यालय इमारत तयार करण्याचा प्रस्ताव समोर आला. त्यानुसार कार्यकारिणीने आणि सभागृहाने या प्रस्तावाला मंजुरी दिली. हा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत वरिष्ठ स्तरावर पाठवण्यात आला. या कार्यालयाला विद्यमान सरकारने मान्यता दिली असून २३ कोटी ७२ लाख ३३ हजार ७०१ रुपयांच्या अंदाजपत्रक खर्च तरतुदीला मान्यता दिली. नवीन कार्यालयामध्ये नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष यांच्यासह मुख्याधिकारी तसेच गटनेते, नगरसेवक, अधिकारी यांना प्रशस्त दालने मिळणार आहेत. नगरपरिषदेत कामासाठी येणार्या सामान्य नागरिकांसाठीही प्रतीक्षालय या इमारतीत असणार आहे. या कामाचे कार्यारंभ आदेश मिळाल्यापासून ही इमारत दोन वर्षात (पावसाळा वगळून) तयार करणे अपेक्षित आहे. पालघर शहरातील सध्या अस्तित्वात असलेल्या अग्निशमन केंद्राच्या सर्वे क्रमांक ११५/अ/१/२ या जमिनीवर नगरपरिषदेचे अद्ययावत कार्यालय उभारण्यात येणार आहे. हे कार्यालय तळमजला अधिक दोन मजल्याचे असणार आहे. हे कार्यालय एकूण ३०२०० चौरस फुटाच्या जवळपासच्या क्षेत्राचे असणार आहे. तळमजल्याचे बांधकाम १०१३३ चौरस फूट आहे. तर पहिला मजला ९८५८ चौरस फूट आणि दुसरा मजला १०२०८ चौरस फूटच्या क्षेत्राच्या जवळपास आहे. या इमारतीच्या तळमजल्यावर सामान्य सुविधा विभाग, अग्निशमन विभाग, सामान्य प्रशासन विभाग, उपहारगृह, हिरकणी कक्ष, महिला बालविकास विभाग, स्वच्छतागृह, आरोग्य विभाग, अतिविशेष व्यक्तींचे कक्ष, बहुउद्देशीय सभागृह, संगणक कक्ष विभाग, कर विभागाचे अभिलेख कक्ष, कर विभाग असे विभाग असणार आहेत.पहिल्या मजल्यावर नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष कक्ष यासह त्यांच्या सचिवांचे कक्ष, मुख्याधिकारी, उपमुख्य अधिकारी यांच्या दालनांसह त्यांच्या सचिवांचे कक्ष व बैठक कक्ष, नागरिकांसाठी प्रतीक्षालय, विरोधी पक्षाचे कक्ष, स्वच्छतागृह, नगरसेवक कक्ष, सभासचिवांचा कक्ष, नगर परिषदेच्या पाच विषय समित्यांच्या सभापतींसाठी स्वतंत्र कक्ष असणार आहेत. दुसर्या मजल्यावर विविध अतिरिक्त विभागांचे कक्ष, अभिलेख कक्षासह भांडार विभाग, सभागृह, वित्त व लेखा परीक्षक तसेच कर आणि घरपट्टी विभाग, बांधकाम विभाग, पाणीपुरवठा व नगर रचना विभाग, स्वच्छतागृह, सुरक्षा यंत्रणा कक्ष, अतिविशेष व्यक्तींसाठी विश्रांती कक्ष, नगरपालिकेचा महासभागृह तसेच अधिकारी वर्गासाठी काही जागा दुसऱ्या मजल्यावर राखीव ठेवण्यात आले आहेत.

# रास्त धान्य दुकानात लाभार्थींची होतेय वाढ

**वसई/प्रतिनिधी**

पालिका क्षेत्रात सरकारी धान्य घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे. वाढती शिधा लाभार्थींची संख्या लक्षात घेता शासनाने साडेतीन हजार इतका इष्टांक मंजूर केला आहे. त्यामुळे आणखीन साडेतीन हजार नवीन शिधा लाभार्थींना याचा लाभ मिळणार आहे. वसई-विरार शहरात अन्न नागरी पुरवठा विभागातून शिधा पत्रिका लाभार्थ्यांना पुरवठा विभागातून सवलतीच्या दरात धान्य वाटप केले जाते. १७९ धान्य वाटप केंद्रातून ५ लाख ९२ हजार ५१५ लाभार्थ्यांना याचा लाभ मिळतो. महानगरातील अनेक कुटुंब कामानिमित्त स्थलांतरित होऊन मुंबईतून वसईत येऊन राहत आहे. त्यांनी सुद्धा वसईच्या पुरवठा विभागात आपल्या मुंबईच्या शिधापत्रिकेच्या नोंदी केल्या आहेत. यात अनेक गरजू लाभार्थी आहेत. मात्र पुरवठा विभागाकडे पुरेश्या प्रमाणात धान्याचा इष्टांक नसल्याने धान्य वाटप करताना अडचणी येतात. दर महिन्याला ११ हजार ७५२ क्विंटल गहू व १७ हजार ६२८ क्विंटल तांदूळ वसईत वाटावा लागतो. इतर शिधा लाभार्थींना याचा लाभ देता यावा यासाठी सातत्याने पुरवठा विभागाकडून वाढीव इष्टांकाची मागणी करण्यात येत होती. सद्यस्थितीत शासन स्तरावरून वसई विरारसाठी केवळ साडे तीन हजार शिधा लाभार्थींना लाभ देता येईल इतकाच इष्टांक मंजूर केला असल्याची माहिती पुरवठा विभागाने दिली आहे. याशिवाय १४ अंत्योदय शिघापत्रिका धारकांसाठी इष्टांक मंजूर झाला आहे.

# सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रोत्सव मंडळांनी उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमाचा प्रसार करण्याचे पालकमंत्री यांचे आवाहन!

**पालघर/प्रतिनिधी**



केंद्र पुरस्कृत उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रमाचा प्रसार जिल्ह्यातील गणेशोत्सव मंडळ व नवरात्रोत्सव मंडळांनी करावा आणि पालघर जिल्हा साक्षर करण्यासाठी आपले योगदान द्यावे, असे आवाहन सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री पालघर जिल्हा रवींद्र चव्हाण यांनी केले आहे. अशा आशयाचे आवाहन पत्र पालकमंत्री यांनी दिले आहे.सन २०११ च्या जनगणनेनुसार, देशातील १५ वर्षे आणि त्यावरील वयोगटातील निरक्षरांची संख्या २५.७६ कोटी आहे. त्यातील पुरुष ९.०८ कोटी आणि १६.६८ कोटी महिला आहेत. सन २००९-१० ते २०१७- १८ दरम्यान राबविण्यांत आलेल्या साक्षर भारत कार्यक्रमांतर्गत ७.६४ कोटी एवढे साक्षर झालेल्या व्यक्तींच्या प्रगती अहवालाचा विचार करता, असा अंदाज आहे की, सध्या देशात सुमारे १८.१२ कोटी लोक अजूनही निरक्षर आहेत. तसेच एकट्या पालघर जिल्ह्यातील निरक्षरांची संख्या एकूण ६,९३,६४७ असून हे प्रमाण (निरक्षरतेचे) एकूण लोकसंख्येच्या २२.९६% इतके आहे. आपला पालघर जिल्हा हा राज्यातील आदिवासी जिल्ह्यांपैकी एक आहे. त्यामुळे आपल्या जिल्ह्यात जे अजूनही असाक्षर आहेत, त्यांना नवसाक्षर करणे गरजेचे आहे. या अनुषंगाने गणेशोत्सव व नवरात्रोत्सवात केंद्र पुरस्कृत उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रमाचा प्रचार प्रसार करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रोत्सव मंडळांना आवाहन करण्यात येते की, आपल्या सार्वजनिक मंडळाच्या वतीने नव भारत साक्षरता कार्यक्रमाच्या प्रचार प्रसार करण्यासाठी आपण साक्षरतेवर आधारित पोस्टर्स, बॅनर्स, उद्बोधनपर सांस्कृतिक कार्यक्रम, पथनाट्ये, नाटिका इ. मार्फत जनजागृती करून साक्षरतेचे महत्त्व सर्व जनमाणसांत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करावेत. आपल्या या सक्रिय सहभागामुळे राज्यात केंद्र पुरस्कृत उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत पालघर जिल्हा साक्षर होण्यास नक्कीच मदत होईल, असा मला विश्वास आहे. अशा प्रकारचे आवाहन पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी पत्राद्वारे केले आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत जिल्ह्यातील सर्व गणेशोत्सव मंडळ व नवरात्रोत्सव मंडळ यांना ते पत्र गटशिक्षणाधिकारी मुख्याध्यापक केंद्रप्रमुख यांच्यामार्फत पोचवण्यात आले आहे अशी माहिती शिक्षण अधिकारी (योजना) शेषराव बडे यांनी दिली. जिल्हाधिकारी गोविंद बोडके मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी देखील या अभियानाला जिल्ह्यातील असाक्षरांनी जास्तीत जास्त प्रतिसाद देण्याचे आवाहन केले आहे.

# शिक्षिका फहिमुनिसा बागमरू यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार




**लातूर/प्रतिनिधी**

डॉ. जाकिर हुसैन विद्यालयाच्या शिक्षिका सौ. फहिमुनिसा मोहम्मद आब्बास बागमरू यांना राज्य उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. नुकत्याच झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये खा. डॉ. शिवाजी काळगे व छत्रपती संभाजीनगर विभागाचे शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते सौ. फहिमुनीसा बागमारू यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी राज्य उर्दू शिक्षक संघटनेचे लातूर जिल्हा अध्यक्ष नुसरत कादरी, संघटनेचे एम. ए. गफार यांची उपस्थिती होती. सौ. फहिमुनीसा बागमारू यांना मिळालेल्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराबद्दल जे. टी. एस. बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष जे.टी. शेख, सचिव ड. यास्मिन शेख, मालिक शेख, जास्मिन शेख, हासरत शेख, मुस्कान शेख, फिरोज सय्यद, मतीन शेख, मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# माकूणसार येथे घरफोडीकरून चोरट्यांनी दागिने, ८० हजारांची रोकड केली लंपास!

**सफाळे/प्रतिनिधी**



गौरीनिमित्त घरातील सर्व सदस्य गावातील जुन्या घरी गेल्याचे पाहून अज्ञात चोरट्यांनी घराचा दरवाजा फोडून लाखो रुपयांचे साडेचार तोळे सोन्याचे दागिने आणि ८० हजाराची रोख रक्कम लंपास केल्याची घटना बुधवार ११ सप्टेंबर रोजी रात्री केळवा सागरी पोलीस स्टेशन हद्दीतील माकूणसार गावाजवळील नवीन साईमंदिराजवळ घडली. पेशाने कॅटरर्स असलेले मिलिंद पाटील यांच्या अडीच दिवसांच्या गणेशमूर्तीचे विसर्जन झाल्यावर बुधवारी सायंकाळी साडेसात वाजता गौरी आगमन असल्याने ते माकूणसार गावातील जुन्या घरी परिवारासोबत गेले होते. यादरम्यान काही अज्ञात चोरांनी रस्त्याशेजारी एकांतात असलेल्या त्यांच्या घराच्या दरवाजाची कडी तोडून आत प्रवेश केला. यात चोरांनी कपाटातील साडेचार तोळयाचे सोन्याचे दागदागिने आणि ८० हजाराची रोख रक्कम चोरून ते पसार झाले. त्यानंतर रात्री नऊ ते साडेनऊ वाजण्याच्या वेळी मिलिंद पाटील घरी परतले असता, घराचा दरवाजा उघडा दिसला. त्यांनी तत्काळ घरात जाऊन पाहिले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी यासंदर्भात केळवा सागरी पोलीस स्टेशनमध्ये चोरी झाल्याची तक्रार दिली असून याप्रकरणाचा अधिक तपास पोलीस करीत आहेत. सध्या सणउत्सवाचे दिवस असून अनेकांचे आपल्या नातेवाईकांकडे जाणे सुरू असते. मात्र यादरम्यान नागरिकांनी घरातील मौल्यवान वस्तू सोबत बाळगाव्या किंवा त्याबाबत योग्य ती उपाययोजना करावी जेणेकरून त्यांचे नुकसान होणार नाही, असे केळवा सागरी पोलीस स्टेशनचे सपोनी विजया गोस्वामी यांनी सांगितले.

# लिफ्टमध्येच अल्पवयीन मुलीचा विनयभंग, कचरावेचकाला अटक

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलींवर जवळच्या लोकांकडून लैंगिक अत्याचार होण्याच्या घटनांचे सत्र सुरूच आहे. मिरा रोड येथे १२ वर्षांच्या चिमुकल्या मुलीवर इमारतीत काम करणाऱ्या कचरावेचकाने लिफ्टमध्ये विनयभंग केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी काशिमिरा पोलिसांनी ५८ वर्षीय आरोपी कचरावेचकाला अटक केली आहे. पीडित मुलगी १२ वर्षांची असून ती मिरा रोड पूर्वेच्या काशिमिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहते. मंगळवारी दुपारी ती शिकवणी वर्गातून घरी परतली होती. लिफ्ट मधून वर जात असताना कचरा वेचक राजेंद्र तुसाबर (५८) हा लिफ्ट मध्ये शिरला आणि त्याने पीडित मुलीचा लिफ्टमध्ये विनयभंग केला. हा प्रकार कुणाला सांगितल्यास मारण्याची धमकी त्याने दिली होती. मात्र मुलीने घरी येऊन झालेला प्रकार आपल्या पालकांना सांगितला. तिच्या पालकांनी याप्रकरणी काशिमिरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार काशिमिरा पोलिसांनी आरोपी राजेंद्र तुसाबर याच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कमल ७४ सह पोक्सोच्या कमल ८ अन्वये गुन्हा दाखल करून अटक केली आहे. बदलापूर मधील शाळेत चिमुकल्या मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचारांच्या घटनांनंतर मुलींवर लैंगिक अत्याचाराच्या प्रश्न ऐरणीवर आला होता. मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयात जानेवारी ते ऑगस्ट २०२४ या ८ महिन्यात विनयभंगाचे २७६ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यात ७९ विनयभंगाचे गुन्हे अल्पवयीन मुलींवर झालेल्या लैंगिक अत्यातारासंदर्भात आहे. या प्रकरणात पोलिसांनी पोक्सो अंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. छेडछाड करणे, पाठलाग करणे, अश्लील शिविगाळ करणे, अश्लील संदेश पाठवणे अशा प्रकरणातही इतर कलमांप्रमाणे विनयभंगाचे गुन्हे दाखल केले जात आहेत. मागील महिन्यात नालासोपारा येथील शाळेतील अमित दुबे शिक्षकाने १४ वर्षीय विद्यार्थीनीवर बलात्कार केल्याचे उघड झाले होते. विरार मध्ये खासगी कोचिंग क्लास चालविणार्या मोर्या नामक शिक्षकाने मुलींचा लैंगिक छळ केला होता. त्याला नागरिकांनी चोप देऊन पोलिसांच्या स्वाधीन केले होते.

# आयजीच्या जीवावर बायजी उदार!

लाडकी बहीण योजना ही कोणत्याही दृष्टिकोनातून महाराष्ट्राला परवडणारी नव्हती. पण केवळ महिलांच्या मतांवर डोळा ठेवून ही योजना राबवली जात आहे. पण ही योजना राबवताना श्रेय वादाचे जे घाणेरडे राजकारण सुरू झालेले आहे, ते अत्यंत कळसवाने आहे. महायुती मधील राष्ट्रवादीचा अजित पवार गट, शिवसेनेचा शिंदे गट आणि भाजपा यांच्यात लाडक्या बहिणी योजनेचे श्रेय घेण्यावरून अक्षरशः लढाई सुरू झालेली आहे. वास्तविक सरकारी योजना म्हटली की, त्या सरकारमध्ये सामील असलेल्या सर्व पक्षांचे त्या योजनेमध्ये श्रेय असते. आणि हे ठाऊक असताना महायुतीतील तिन्ही पक्ष आणि त्यांचे अंधभक्त कार्यकर्ते, लाडकी बहीण योजनेच्या पोस्टरवर आपापल्या नेत्याचे नाव आणी फोटो लावून, ही योजना जणू काही त्याच्याच नेत्याने आणली आणि त्याचां तो नेता, खिशातून पैसे टाकून ही योजना राबवणार आहे असा देखावा निर्माण केला जात आहे. खास करून अजित पवारांचे कार्यकर्ते याबाबत खूप आक्रमक आहेत. पश्चिम महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अजित दादांच्या कार्यकर्त्यांनी लाडकी बहीण योजनेचे पोस्टर लावून, त्यावर फक्त अजित पवारांचा फोटो छापून या संपूर्ण योजनेचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न सुरू केल्याने महायुतीतील इतर दोन पक्ष भडकलेत. अर्थात त्यांना राग येणे स्वाभाविकच आहे. कारण अजित दादाचा राष्ट्रवादी पक्ष, या योजनेचे एकट्याने श्रेय कसा काय घेऊ शकतो? असा इतर दोन पक्षांच सवाल आहे. त्यामानाने या श्रेय वादाच्या लढाईत भाजपाचे लोक फारसे कुठे दिसत नाहीत. परंतु शिंदे आणि अजित पवार यांचे कार्यकर्ते अक्षरशः हमरीतुम्रीवर आलेले आहेत. प्रत्येकाला ही योजना आपल्याच नेत्यांनी आणली असे दाखवून द्यायचे आहे. परंतु या योजनेमुळे सरकारचे किती नुकसान झालेले आहे, आणि त्याचे परिणाम भविष्यात महाराष्ट्राला कशाप्रकारे भोगावे लागणार आहेत, याबद्दल कोणी बोलायला तयार नाही. अर्थात राजकीय अंधभक्तना तेवढी अक्कल असेल तर बोलतील ना! लाडकी बहीण योजनेसाठी सरकारला दर महिन्याला ४५ हजार कोटींची तरतूद करावी लागते. परिणामी विकासाच्या अनेक योजना रखडल्या आहेत. दुसऱ्या खात्याचा निधी या लाडक्या बहिणीवर खर्च केला जात आहे. कर्जाचे हप्ते थकलेत. साडेसात लाख कोटींचे कर्ज आता ८ ते ९ कोटींवर जाणार आहे. आणि ते फेडण्यासाठी जनतेच्या खिशात हात घातला जाणार आहे. जनतेवर मोठ-मोठे कर लादले जाणार आहेत. महागाईचा आणखी आगडोब उसळणार आहे. परंतु महायुतीतील अंध भक्तांना हे अजिबात दिसत नाही. त्यामुळे लाडकी बहीण योजना आम्ही आणली आणि त्यामुळे महिलांचा कसा फायदा झाला, याचा ते प्रचार करण्यात गुंतले आहेत. लाडकी बहीण योजनेबाबत अनेक महिलांनीही नापसंती व्यक्त केली आहे. कित्येक महिलांनी तर सोशल मीडियावर या योजनेची चिरफाड केली आहे. अशा प्रकारच्या योजना आणण्यापेक्षा महिलांना रोजगार उपलब्ध करून द्या. किंवा घरगुती सामानावर जी प्रचंड दरवाढ झालेली आहे ती कमी करा. अशा मागण्या कित्येक महिलांनी केलेल्या आहेत. परंतु त्याकडे कोणाचे लक्ष नाही. फक्त लाडक्या बहीण योजनेचे श्रेय उपटण्यासाठी महायुतीतील तिन्ही पक्ष प्रयत्न करीत आहेत. विधानसभा निवडणूक तोंडावर आलेली आहे, त्यामुळे त्याना वाटते की लाडकी बहीण योजनेमुळे आपली सत्ता टिकेल. पण तसे कदापि होणार नाही. कारण लाडकी बहीण योजनेतील सरकारचा तोटा आणि भविष्यातील आर्थिक संकटे याची सर्वांना चाहूल लागलेली आहे. त्यामुळे महायुतीने दर महिन्याला महिलांना दीड हजार रूपयाची लाच दिली, तरी त्या बदल्यात त्याना समजदार महिला विधानसभेसाठी मतदान करतील, अशा भ्रमात त्यांनी राहू नये. कारण आजकाल लोक हुशार झालेत. कोणते सरकार राजाचा विकास करू शकते, कोणत्या सरकारमुळे राज्याची प्रगती होऊ शकते, कोणत्या सरकारमुळे देशातील माय भगिनींना संरक्षण मिळू शकते, हे आता लोकांनाही कळून चुकलेले आहे. त्यामुळे अशा थातूरमातूर योजना आणायच्या आणि त्याचे श्रेय उपटण्यासाठी पोस्टरबाजी करायची हे काही बरोबर नाही. आणि त्यातून महायुतीला फार मोठा फायदा होईल असे समजणे म्हणजे मूर्खांच्या नंदन वनात वावरण्यासारखे आहे. अर्थात ते काही असो पण श्रेय वादाची ही लढाई, विधानसभा निवडणूक जशी जशी जवळ येईल तशी तशी आणखी तीव्र होणार आहे. कदाचित याच लढाईमुळे महायुती फुटू शकते. कारण महायुतीतील प्रत्येक पक्ष लाडक्या बहिणीसाठी हातघाईवर आलाय. प्रत्येकाला लाडक्या बहिणी योजनेचे श्रेय आणि त्या श्रेयातून मिळणारी मते हवी आहेत. त्यामुळे आपणच लाडकी बहीण योजना आणली, असे दाखवण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु या प्रयत्नातूनच महायुतीला सुरुंग लागेल. आणि महायुतीच्या चिरफाल्या उडतील असे राजकीय जाणकारांना वाटत आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजना हा महायुतीसाठी आधार ठरण्याऐवजी एक मोठा खड्डा ठरणार आहे आणि त्या खड्ड्यात एकदा का महायुती पडली, की त्यातून बाहेर पडणे त्यांना खूप कठीण जाईल.

## विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी 'महावाचन उत्सव'

मुंबई/प्रतिनिधी

व्यक्तिमत्व विकासाचे तसेच सृजनशीलता वाढीस लागण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणजे वाचन! वाचनामुळे आनंद मिळतो. विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देण्यासाठी त्यांना पुस्तकांकडे आकर्षित करावे आणि लहान वयातच वाचनाची गोडी निर्माण करण्याच्या उद्देशाने शालेय शिक्षण विभागामार्फत महावाचन उत्सव २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात ११ सप्टेंबर, २०२४ पर्यंत ९६,६३९ (८८.९५ टक्के) शाळांमधून १२,३०,५५७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला असल्याची माहिती, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालक आर.विमला यांनी दिली आहे. मोबाईल, टीव्ही, संगणक आदी स्क्रीनच्या वेडामुळे हल्ली मुले वाचनाच्या आनंदापासून दूर जाताना दिसत आहेत. अशावेळी त्यांना पुन्हा पुस्तकांच्या सहवासात आणण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने महावाचन उत्सव या उपक्रमाची सुरुवात केली आहे. हा उपक्रम २० सप्टेंबर, २०२४ पर्यंत सुरू राहणार आहे.

**महावाचन उत्सवाचे ब्रँड ॲम्बेसेडर अमिताभ बच्चन**

मागील वर्षी राज्यातील सर्व शाळांमध्ये महाराष्ट्रातील 'वाचन चळवळ' हा उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमामध्ये ६६ हजार शाळा व ५२ लाख विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. याची पडताळणी 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स' मार्फत करण्यात आली होती. या उपक्रमास विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला होता. हा प्रतिसाद लक्षात घेऊन सन २०२४-२५ या वर्षी देखील रिड इंडिया यांच्या सहकार्याने राज्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये 'महावाचन उत्सव' राबविण्यात येत आहे. या उपक्रमाकरीता ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड करण्यात असून त्यांनी देखील सर्वांना दररोज किमान १० मिनीटे नवीन काही वाचनाचे आवाहन केले आहे. राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधील इयत्ता तिसरी ते बारावी इयत्तेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी इयत्ता तिसरी ते पाचवी, सहावी ते आठवी व नववी ते बारावी असे तीन गट निश्चित करण्यात आले आहे.

**उपक्रमाची उद्दिष्टे**

वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणे. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण करणे. मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीशी विद्यार्थ्यांची नाळ जोडणे. दर्जेदार साहित्याचा व लेखक, कवींचा विद्यार्थ्यांना परिचय करुन देणे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासास चालना देणे. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला व भाषा संवाद कौशल्य विकासास चालना देणे ही या उपक्रमाची उद्दिष्टे आहेत.

**उपक्रमाचे स्वरुप**

या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी www.mahavachanutsav.org या नावाने वेब प्लीकेशन विकसित करण्यात आले असून राज्यातील सर्व शाळा नोंदणी करीत आहेत. सहभागी विद्यार्थ्यांनी आवडत्या पुस्तकाचे वाचन करुन वाचन केलेल्या पुस्तकाविषयी अभिप्राय लेखन करावयाचे आहे. तसेच सहभागी विद्यार्थ्यांना वाचन केलेल्या पुस्तकाविषयी अभिप्राय देण्यासाठी एका मिनिटाचा व्हिडिओ, ऑडिओ क्लिप अपलोड करण्याची सुविधादेखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या उपक्रमासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक हे राज्यस्तरीय नोडल अधिकारी असून जिल्हास्तरावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक) व तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी यांच्यामार्फत हा उपक्रम राविण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्राबाबत ही जबाबदारी संबंधित समकक्ष अधिकाऱ्यांची असणार आहे.

**परिक्षण व पारितोषिके**

विद्यार्थ्यांनी वाचन केलेल्या पुस्तकाबाबत लिखित स्वरुपात मांडलेल्या विचारांच्या आधारे मूल्यांकन करण्यात येऊन प्रत्येक स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांची निवड तीन गटांसाठी स्वतंत्रपणे करण्यात येणार आहे. विजयी विद्यार्थ्यांना पुस्तक स्वरुपात पारितोषिक तर सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. ग्रंथ प्रदर्शन, पुस्तक मेळाव्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना, पालकांना, शिक्षकांना नवनवीन पुस्तकांची माहिती मिळावी व वाचनास प्रोत्साहित करावे या उद्देशाने यावर्षी प्रत्येक तालुक्यात ग्रंथ प्रदर्शन, पुस्तक मेळावे घेण्यात आले आहेत. या मेळाव्यात त्या-त्या जिल्ह्यातील सार्वजनिक व खाजगी ग्रंथालयांना तसेच विविध प्रकाशकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले असल्याची माहिती श्रीमती आर.विमला यांनी दिली आहे.

## धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ॲटोरिक्षा मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाकडे नोंदणी करण्याचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी



राज्य शासनाने धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ॲटोरिक्षा मिटर्ड टॅक्सी, टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची स्थापना केलेली आहे. या कल्याणकारी मंडळाकडून केंद्र व राज्य शासनामार्फत व राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ ऑटो रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालकांना देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत याबाबतची नोंदणी प्रक्रिया राबविण्यात येत आहे. जीवन विमा व अपंगत्व विमा योजना, आरोग्य विषयक लाभ, कर्तव्यावर असताना दुखापत झाल्यास अर्थसहाय्य योजना (रु. ५० हजारांपर्यंत), पाल्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना, कामगार कौशल्य वृध्दी योजना, ६५ वर्षावरील ॲटोरिक्षा मिटर्ड टॅक्सी परवानाधारक यांना निवृत्ती सन्मान योजने अंतर्गत सानुग्रह अनुदान, नविन ऑटो- रिक्षा तथा मिटर्ड टॅक्सी खरेदी, गृह खरेदीसाठी घेण्यात येणारे कर्ज, राज्यस्तरीय मंडळाने वेळोवेळी मान्यता दिलेल्या इतर कल्याणकारी योजना, शासनाने निर्देशित केलेल्या इतर कल्याणकारी योजना, या व्यतिरिक्त शासनाने घोषित केलेल्या अनुषंगिक योजना योजनांचा लाभ या मंडळाकडून दिला जाणार आहे. सर्व योजनेसंबंधीत नियम, अटी व मार्गदर्शक सुचना महाराष्ट्र ऑटो- रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाकडून निर्गमित करण्यात येतील. मंडळाच्या कल्याणकारी योजनेचा लाभ मिळविण्याची चालकांनी जिल्हा कार्यालयामध्ये विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा. प्रत्येक अर्ज जिल्हास्तरीय समितीकडून त्यांना दिलेल्या निकषानुसार पात्रतेसाठी तपासले जातील. मंजुर लाभ राज्यस्तरीय मंडळाने व जिल्हास्तरीय समितीने वेळोवेळी विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार वितरीत केले जातील. ऑटो-रिक्षा परवानाधारका, ऑटो रिक्षा मिटर्ड टॅक्सी चालकांनी मंडळाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील परिवहन कार्यालयामार्फत याबाबतची नोंदणी प्रक्रिया राबविण्यात येत आहे. नोंदणीकृत चालकांना लाभ देण्यासाठी मंडळाच्या संबंधित जिल्ह्यातील कार्यालयाकडून ओळखपत्र जारी करण्यात येईल. मंडळाच्या सभासद होण्यासाठी अर्जदाराने महाराष्ट्र राज्यामध्ये नोंदणी असलेल्या ऑटो-रिक्षा मिटर्ड टॅक्सी अनुज्ञप्ती व बॅज धारण केले असणे बंधनकारक राहील. पात्र अर्जदाराच्या कुटुंबातील व्यक्ती मंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असतील. तथापि, कुटुंबातील सदस्य संख्या ही चालक, जोडीदार व मुले मिळून ४ पर्यंत मर्यादित असेल. जो सभासद सलग एक वर्षापेक्षा जास्त काळ मंडळाची वर्गणी भरणार नाही. अशा सभासदाचे सभासदत्व सुनावणीची एक संधी देऊन रद्द करण्यात येईल. परवानाधारकास दिव्यांगत्व आले तरी तो परवानाधारक देखील कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र राहील. परवानाधारकाचा मृत्यु झाल्यास त्याची अनुज्ञप्ती त्याच्या कायदेशीर वारसास हस्तांतरित करण्यात येते. मयत परवानाधारकाचा कायदेशीर वारस त्याच्याकडे अनुज्ञप्ती अथवा बॅज नसेल तरी हा कायदेशीर वारस कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र राहील. नोंदणी शुल्क व ओळखपत्र शुल्काची रक्कम ५०० रुपये राहील. ही नोंदणी शुल्क अर्जासोबत जमा करण्यात येईल. तसेच, नोंदणी शुल्क व ओळखपत्र शुल्काची रक्कम राज्यस्तरीय मंडळ यांनी वेळोवेळी निश्रि्चत केल्याप्रमाणे असेल. वार्षिक सभासद शुल्क वार्षिक सभासद शुल्क रक्कम ३०० रुपये राहील. तसेच वार्षिक सभासद शुल्काची रक्कम राज्यस्तरीय मंडळ यांनी वेळोवेळी निश्रि्चत केल्याप्रमाणे असेल. लातूर जिल्ह्यातील सर्व ऑटोरिक्षा, मिटर्ड टॅक्सी चालकांनी धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ॲटोरिक्षा मिटर्ड टॅक्सी टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाकडून विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे सदस्य नोंदणी करावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर : कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७(१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत १२ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते २६ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## 'स्वच्छता ही सेवा' अभियानात लोकसहभाग आवश्यक - जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर/प्रतिनिधी

जिल्ह्यात १४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत 'स्वच्छता ही सेवा' अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होवून आपला परिसर स्वच्छ करावा. तसेच हे अभियान लोकचळवळ बनवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. या अभियानाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यकारी अभियंता प्रवीण सुमंत, प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभागीय नियंत्रक अश्र्वजीत जानराव, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे यावेळी उपस्थित होते. मराठवाडा मुक्तिदिनी १७ सप्टेंबर रोजी ध्वजारोहणानंतर सर्वांनी स्वच्छतेची शपथ घेवून आपला परिसर, गाव, शहर स्वच्छ करण्यासाठी कृतीशील प्रयत्न करावेत. तसेच यादिवशी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी स्वच्छता विषयक संदेश देण्यासाठी प्रभात फेरीचे आयोजन करावे. लोकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देवून आपले गाव, शहर स्वच्छ ठेवण्याबाबत जनजागृती करावी. यासोबतच प्रत्यक्ष स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. शहरी भागामध्ये सर्वाधिक कचरा जमा होणाऱ्या परिसरात विविध स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने स्वच्छता मोहीम राबविण्यात यावी. तसेच रस्ते, चौक सुशोभीकरणासाठी विविध संस्था, खासगी आस्थापना यांचे सहकार्य घेवून आवश्यक कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले. स्वच्छता ही सेवा अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्था, ग्रामपंचायती यांचा प्रजासत्ताक दिनी गौरव करण्यात येणार आहे. तसेच स्वच्छता क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, व्यक्ती यांनीही जास्तीत जास्त लोकांपर्यंत स्वच्छतेचा संदेश पोहोचविण्यासाठी स्थानिक प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले.

शहरी आणि ग्रामीण भागात 'स्वच्छता ही सेवा' अभियानाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा यावेळी जिल्हाधिकारी यांनी आढावा घेतला. तालुकास्तरीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे या बैठकीला उपस्थित होते.

## १६४० मेट्रिक टन कचरा उचलला!

लातूर/प्रतिनिधी

शहरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी नेमलेल्या जन-आधार सेवाभावी संस्थेचे कंत्राट संपले असून महानगरपालिकेने शहरातील कचरा उचलण्यासाठी पुढाकार घेतला आहे. मागील ५ दिवसात मनपाच्या वतीने १६४० मेट्रिक टन कचरा उचलण्यात आला असून आगामी ८ दिवसात उर्वरित कचरा उचलण्याची ग्वाही मनपाच्या वतीने देण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर घनकचरा व्यवस्थापनासाठी नवी एजन्सी नेमण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. जन- आधार सेवाभावी संस्थेला शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचे कंत्राट देण्यात आलेले होते. दि. ३१ ऑगस्ट रोजी हे कंत्राट संपुष्टात आले. त्यामुळे १ सप्टेंबर पासून पालिकेच्या वतीने शहरात साचलेला कचरा उचलण्याची यंत्रणा राबविण्यात येत आहे. शहराच्या विविध भागातील कचऱ्याचे ढिगारे उचलण्याचे काम सुरू आहे. यासाठी ४ जेसीबी,९ हायवा व १२० घंटागाड्यांचा वापर सुरू आहे. ५ सप्टेंबर पासून आजपर्यंत एकूण १६४० मेट्रिक टन कचरा उचलण्यात आला आहे. उर्वरित कचरा उचलण्याची कार्यवाही पुढील ८ दिवसात पूर्ण करण्यात येणार असल्याचे मनपाच्या वतीने कळविण्यात आले आहे. कचरा निविदा प्रक्रियेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने याचिका खारीज केली आहे. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापन कामातील पात्र निविदा धारकास कार्यादेश दिले जाणार आहेत. नवीन कंत्राटदार नेमून घनकचरा व्यवस्थापनाचे काम सुरळित केले जाणार आहे.

## लातूर येथे ग्रीन क्लबच्या माध्यमातून जागतिक जल दिन मोठ्या उत्साहात साजरा

लातूर/प्रतिनिधी

ग्रीन क्लबच्या माध्यमातून जागतिक जल दिन २०२४ मोठ्या उत्साहात साजरा साजरा करण्यात आला होता. या निमित्ताने घेण्यात आलेल्या विविध गटातील स्पर्धांचे पुरस्कार जाहीर झालेले आहेत. पुरस्कार प्राप्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुरेश हल्लाळी, ग्रीन क्लब फॅकल्टी कोऑर्डीनेटर प्राध्यापक रतन सिंह राजपूत यांनी केलेल्या कार्याबाबत विशेष अभिनंदन करण्यात आले.तसेच सर्वांनी केलेल्या या कार्याची दखल घेत युनिसेफ कडून जागतिक स्तरावर प्रकाशित करण्यात येणाऱ्या वार्षिक अहवालात अभियानाअंतर्गत केलेल्या कार्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. हे कार्य आत्ता जागतिक स्तरावर पोहोचले आहे. राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय पोस्टर स्पर्धा पुरस्कारांमध्ये एम एस बिडवे अभियांत्रिकीची विद्यार्थीनी कु.श्र्वेता भडके हिने प्रथम पारितोषिक पटकावले असून जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये महाविद्यालयास सर्वातम ग्रीन क्लबचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. लातूर जिल्ह्याचा बहुमान वाढवणा-या बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राचार्य, ग्रीन क्लब समन्वयक प्राध्यापक व विद्यार्थी यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन आणि कौतुक करण्यात येत आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण**, सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे**, कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे**. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

16 TO 22 SEPTEMBER 2024 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 9/14/2024 8:52 PM Page 1



# वृद्ध महिलेच्या खूनाची उकल; दोघांना ठोकल्या बेड्या

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सोलापूर ग्रामीणचा पदभार घेतल्यापासून जिल्ह्यातील गुन्हेगारीवर लक्ष केंद्रीत केले असून जिल्ह्यातील चालू वर्षातील उघडकीस न आलेल्या खुनाच्या गुन्ह्यांचा आढावा घेतला होता. त्यामध्ये कामती पोलीस ठाणे, गु.र.नं. ११७/२०२४, भा.द.वि.क. ३०२.३९४ या गुन्ह्यामध्ये सिंधूबाई हरीबा घाडगे, वय ७४ वर्षे, रा. अरबळी या त्यांचे शेतातील वस्तीवरील घरात एकट्याच राहण्यास असतात. दिनांक २९/०४/२०२४ रोजी रात्री जेवण करून त्या झोपी गेले असता अज्ञात चोरट्यांनी प्रवेश करून घरातील सोन्याचे दागिणे चोरण्याच्या उद्देशाने जबर मारहाण करून गंभीर जखमी केल्याने त्या जागीच मयत झाल्या होत्या. सदर गुन्ह्याचा तपास हा सहायक पोलीस निरीक्षक, कामती पोलीस ठाणे हे करत होते. परंतू अद्याप सदरचा गुन्हा उघडकीस आला नव्हता. यामुळे अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक,



सोलापूर ग्रामीण यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत सुरेश निंबाळकर, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांनी सुचना दिले होते. त्यावरून पोनि सुरेश निंबाळकर यांनी गुन्ह्याच्या झालेल्या तपासाचा आढावा घेवून गुन्हा उघडकीस आणणेबाबत रविराज कांबळे, पोलीस उपनिरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण व त्यांच्या पथकास मार्गदर्शन केले होते. त्यावरून पोसई रविराज कांबळे यांचे पथकातील पोकों हरीश थोरात व राहूल दोरकर यांना सदरचा गुन्हा करणारे आरोपींची माहिती ही गोपनिय बातमीदारांकडून समजली होती. त्यावरून सदरचे पथक हे आरोपींच्या मागावर असताना दिनांक १२/०९/२०२४ रोजी ते २ आरोपी हे बेगमपूर येथील पुलाखाली थांबले असल्याची माहिती समजली होती. त्यावरून पोसई कांबळे यांनी पथकासह बेगमपूर येथे जावून सापळा लावला असता आरोपींना पोलीस आल्याचा सुगावा लागताच त्यांनी पळण्याचा प्रयत्न केला परंतु पोलीस पथकाने पाठलाग करून शिताफीने ताब्यात घेतले आहे. सदर आरोपीकडे केलेल्या कौशल्यपूर्ण तपासामध्ये सदर आरोपींना सदरचा गुन्हा केल्याचे कबूल केले आहे. त्यावरून सदर आरोपींना पुढील तपासकामी कामती पोलीस ठाणेच्या ताब्यात देण्यात आले असून गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि ज्ञानेश्वर उदार, कामती पोलीस ठाणे हे करत आहेत. सन २०२४ मध्ये स्थानिक गुन्हे शाखेकडून उघडकीस न आलेले खूनाचे ६ आरोपी निष्पन्न करून त्यांना अटक करून उघड केले आहेत. सदरची कामगिरी ही सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर, पोलीस उपनिरीक्षक रविराज कांबळे, पोह प्रकाश कारटकर, विरेश कलशेट्टी, पो.कॉ.हरीश थोरात, राहूल दोरकर, धनराज गायकवाड, अजय वाघमारे, यश देवकते, सागर ढोरे-पाटील, अन्वर आतार, सतिश बुरकुल सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांनी केली आहे.

# वसईच्या भोयदापाडा येथील बोगस डॉक्टरवर महानगरपालिकेची कारवाई

**वसई/प्रतिनिधी**

वसई विरार शहरात पुन्हा एकदा बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट सुरू झाला आहे. नुकताच पालिकेच्या वैद्यकीय विभागाने वसई पूर्वेच्या भोयदापाडा येथील बेकायदेशीरपणे दवाखाना चालविणाऱ्या बोगस डॉक्टरवर कारवाई केली आहे. यावेळी डॉक्टर नसताना कर्मचाऱ्याकडून



रुग्णांवर उपचार केले जात असल्याचे उघड झाले आहे. वसई विरार शहराचे नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. विविध ठिकाणी वाढते अनधिकृत बांधकामे व बैठ्या चाळी अशा दाटीवाटीच्या भागात बोगस डॉक्टर दवाखाने थाटू लागले आहेत. नुकताच सातीवली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय आरोग्य पथक तपासणीसाठी फिरत असताना वसई पूर्वेच्या भोयदापाडा राजावळी रस्त्यावर बालाजी क्लिनिक या नावाने कोणतीही परवानगी न घेता बोगस डॉक्टरद्वारे दवाखाना चालविला जात असल्याची माहिती मिळाली होती. शुक्रवारी दुपारी डॉ. श्रीनिवासराव धुधमल आणि पथक व पोलीस यांना सोबत घेऊन धाड टाकली. त्यावेळी डॉक्टर नसतानाही कामासाठी ठेवलेल्या कर्मचाऱ्यांकडून रुग्णाला इंजेक्शन देऊन उपचार केले जात असल्याचे उघड झाले आहे. रामचंद्र रामदूर यादव असे या कर्मचाऱ्याचे नाव असून कोणतीही वैद्यकीय डिग्री नसल्याचे निष्पन्न झाले आहे. दवाखान्याला डॉ. अरविंद कुमार यादव यांचा फलक लावून त्या ठिकाणी कर्मचारी रुग्णांना सेवा देत होता अशी माहिती पालिकेच्या वैद्यकीय विभागाने दिली आहे. दवाखान्यात इन्जेक्शन्स, आय. व्हि. सेट व इतर ॲलोपॅथी औषधे आढळून आली असून याप्रकरणी रामचंद्र यादव याच्या विरोधात वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. वसई विरार महापालिकेच्या कार्यक्षेत्रात बोगस वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांची शोध मोहीम सुरूच आहे. दोषी आढळून आल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाते असे पालिकेने सांगितले आहे. याशिवाय आपल्या परिसरात असे अवैध (बोगस) वैद्यकीय व्यावसायिक असल्याचे निदर्शनास आल्यास लगेचच जवळच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात माहिती द्यावी असे आवाहनही नागरिकांना पालिकेने केले आहे.

# वाड्यात मोकाट कुत्र्यांचा हौंदोस

**वाडा/प्रतिनिधी**



वाडा शहरातील मुख्य बाजार पेठेत व इतर ठिकाणी तब्बल १५ जणांना एका मोकाट कुत्र्याने चावा घेतल्याचा प्रकार घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कुत्र्याने केलेल्या हल्ल्यातील जखमीना वाडा ग्रामीण रुग्णालयात उपचारसाठी दाखल करणायत आले होते. तीव्र व सौम्य प्रमाणातील जखमी रुग्णांची नावे उमेश बुधर, विनोद धापटे, भरत सापटे, देविदास जाधव, प्रकाश मुकणे, फैजान पाटकर, महेंद्र पराड, आरिफ अन्सारी, अतुल तरे, राजू वाघ, अकिल सिंग, चंद्रकांत खैरे, विवेश चोरघे रुपेश सवरा, सागर गुप्ता यांच्यावर उपचार करून घरी पाठविण्यात आले आहे तर बुधवारी सकाळी प्रथमेश गंधे या मुलावर सुद्धा मोकाट कुत्र्याने हल्ला केला या हल्ल्यात प्रथमेशच्या पायला दुखापत झाली होती त्याच्यावर उपचार करून घरी पाठविण्यात आले आहे. मागील दोन दिवसात घडलेल्या या प्रकारामुळे नागरिक विशेषतः पालक भयभीत झाले असून या मोकात कुत्र्याचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.

# वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सफाळे पोलिसांची नो पार्किंग झोनची उपाययोजना



**सफाळे/प्रतिनिधी**

गणेशोत्सव काळात नागरिकांची वाढती रेलचेल पाहता बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या उद्भवण्याची शक्यता लक्षात घेत सफाळे पोलिसांनी यावर तोडगा काढला आहे. रेल्वे फाटक ते इब्राहिम मंजिल भागात ७ सप्टेंबरपासून 'नो पार्किंग झोन' घोषित करण्यात आले असून या नियमाचे पालन न करणार्या वाहनचालकांवर कडक कारवाई केली जाणार आहे. पालघर तालुक्यातील सफाळेतील पूर्व, पश्चिम भागातील सुमारे ५० ते ५५ गावापाड्यातील नागरिकांना दैनंदिन आणि सणउत्सवाच्या खरेदीसाठी सफाळे बाजारपेठेचा एकमेव पर्याय आहे. सध्या सर्वत्र गणेशोत्सवाची धामधूम असल्याने नागरिक मोठ्या संख्येने खरेदीसाठी येत आहेत. अशातच दैनंदिन वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सफाळे वाहनचालकांमुळे सफाळे रेल्वे फाटकापासून ते थेट स्टेट बँक परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. त्यामुळे खरेदीसाठी बाजारपेठेत आलेल्या नागरिकांना वाहतूक कोंडीचा मोठा त्रास होतो. यासंदर्भात सफाळे पोलिसांनी यापूर्वीच सम व विषम पद्धतीने पार्किंगची व्यवस्था केली आहे. मात्र सणउत्सवाच्या वेळी पार्किंग केलेल्या वाहनांमुळे तसेच रेल्वे फाटक बंद असल्यावर वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना चालणे जिकारीचे होते. सोबतच वाहतूक पोलिसांवर देखील त्याचा ताण वाढत आहे. याकरिता सफाळे पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्ता शेळके यांनी वाहतूक कोंडीचा त्रास दूर करण्यासाठी ७ सप्टेंबरपासून सफाळे बाजारपेठेत नो पार्किंग झोन ची उपाययोजना जाहीर केली आहे. नागरिकांनी नियमाचे पालन केले तर सर्वांचा वाहतूक कोंडीचा आणि रस्त्यातील अडथळ्यांबाबतचा त्रास नक्कीच दूर होईल. सर्व सफाळेवासीय आणि आजूबाजूच्या गावातील येणाऱ्या सर्वांना याचा फायदा होणार असल्याने सर्वांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे सफाळा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्ता शेळके यांनी सांगितले.

# एसटी बस मेट्रो खांबाला धडकली; ८ प्रवासी जखमी



**ठाणे/प्रतिनिधी**

घोडबंदर येथील ओवळा भागात मंगळवारी पहाटे राज्य परिवहन सेवेची (एसटी) बसगाडी मेट्रो मार्गिकेच्या खांबाला धडकली. या अपघातात चालक आणि वाहकासह आठ प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली. काही दिवसांपूर्वीच एसटी महामंडळाची बसगाडी घोडबंदर येथील पातलीपाडा उड्डाणपूलाजवळील कठड्याला धडकली होती. त्यानंतर हा दुसरा अपघात असल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आंबेजोगाई येथून बोरीवलीच्या दिशेने एसटी बसगाडी वाहतुक करत होती. त्यामध्ये वाहक आणि चालकासह एकूण १३ प्रवासी प्रवास करत होते. ही बसगाडी पहाटे ५.३० घोडबंदर येथील ओवळा नाका परिसरात आली असता, बसगाडीतील चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि बसगाडी मेट्रो मार्गिकेच्या खांबाला धडकली. या धडकेमध्ये बसगाडीच्या पुढील भागाचे नुकसान झाले. तर बसगाडीमधील १३ पैकी आठ प्रवासी जखमी झाले. या प्रवाशांना उपचारासाठी ब्रम्हांड आणि मानपाडा येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. के. अडसूळ (चालक, वय- ३५), चाटे (वाहक), उद्धव चौरे (६५), उर्मिला चौरे (५५), सलीम शेख (५८), आत्मराम शेजुळ (४९), राजश्री शेजुळ (४२) आणि आकांक्षा शेजुळ (३५) अशी जखमींची नावे आहेत.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत जिल्हा परिषद शाळा कालवार भिवंडी तालुक्यात प्रथम!

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी नुकताच राबवण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रम टप्पा क्रमांक २ या राज्यस्तरीय अभियान स्पर्धेत तालुक्यातील कालवार जिल्हा परिषद शाळेने पटकावला आहे. शाळेतील सुसज्ज इमारत, भौतिक सुविधा, विविध उपक्रम, कला क्रीडा सहभाग व विद्यार्थी गुणवत्ता अशा विविध पातळीवरील परीक्षणात भिवंडी महानगरपालिका आणि भिवंडी ग्रामीण तालुक्यातून राहनाळ केंद्रातील जिल्हा परिषद शाळा कालवारने केंद्र स्तर आणि तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे. शाळेने मिळवलेल्या या बहुमाना नंतर सरपंच ॲड महेश म्हात्रे, उपसरपंच सौ ज्योती मोनीष




म्हात्रे व ग्रामपंचायत सदस्य, गट शिक्षणाधिकारी संजय आसवले, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष देवानंद मणिलाल म्हात्रे, उपाध्यक्षा सौ रेखा अभिनय पाटील यांसह ग्रामस्थांनी शाळेच्या मुख्याध्यापीका सौ.अनिला आकाश काबाडी व शिक्षक प्रशांत भोसले, सौ कविता नागावेकर, सौ स्वाती तळकर, सौ प्रगती पाटील, अलंकार वारघडे, सौ संगीता पाटील, सौ उषा बंगाळे यांचे शाळेत विविध उपक्रम राबविण्यात परिश्रम घेऊन शाळेला बहुमान मिळवून दिल्या बद्दल कौतुक केले आहे. कालवार येथील जिल्हा परिषद शाळेची सुसज्ज इमारत,वर्गातील सुशोभन, सुसज्ज आयसीटी प्रयोगशाळा, परसबाग, एन एस क्यू एफ व एचपीसी कार्ड्स, विद्यांजली पोर्टल, सरल, यु डायस प्लस, स्काऊट गाईड, क्रीडा क्षेत्रातील कामगीरी, विद्यार्थी गुणवत्ता आदींमुळे शाळेस चांगले गुण मिळाल्याचे केंद्रप्रमुख शरद जाधव यांनी सांगितले.

# गणेशोत्सव दरम्यान नेत्र चिकित्सा व महिलांना शिवण यंत्र वितरण



**भिवंडी/प्रतिनिधी**

गणेशोत्सव साजरा करताना सामाजिक भान बाळगून विविध सामाजिक उपक्रम राबवीत असल्याने धामणकर नाका मित्र मंडळाचे कार्य इतर मंडळांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत, संस्थाध्यक्ष संतोष शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली देशभरातील मंदिरांची प्रतिकृती गणेशोत्सव काळात बनवून भिवंडीकर नागरिकांना तिचे दर्शन घडवून आणत असल्याने त्यांची प्रशंसा सर्व थरातून होत आहे अशा शुभेच्छा माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी दिल्या आहेत.ते भिवंडी शहरातील एकात्मतेचा राजा म्हणून गौरविल्या जाणाऱ्या धामणकर नाका मित्र मंडळाच्या वतीने गरीब गरजू महिलांना शिवणयंत्र वितरण कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी माजी सभागृह नेते सुमित पाटील, भाजपा सरचिटणीस विशाल पाठारे, राम माळी उपस्थित होते. तर संस्थाध्यक्ष संतोष शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली श्री भैरव सेवा समिती संचालित नेत्र चिकित्सालयाच्या सहकार्याने मोफत नेत्र चिकित्सा व मोफत चष्मा वितरण शिबिराचे आयोजन गणेशोत्सव मंडपात करण्यात आले होते. भैरव सेवा समितीचे प्रमुख अनिल जैन, पालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.बुशरा सय्यद, संस्थाध्यक्ष संतोष शेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या नेत्र चिकित्सा शिबिरात १९७ रुग्णांची नेत्र चिकित्सा करण्यात आली. यापैकी १५० रुग्णांना मोफत चष्मा वितरीत करण्यात आले.तर या शिबिरात मोतीबिंदू झालेले पंधरा रुग्ण आढळून आले असून या रुग्णांची येत्या पंधरा दिवसात धामणकर नका मित्र मंडळ संस्थेच्या माध्यमातून मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून दिल्या जाणार असल्याची माहिती संस्थाध्यक्ष संतोष शेट्टी यांनी दिली आहे.

# विनभंग करणाऱ्या आंबटशौकीनाला वाडा पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**वाडा/प्रतिनिधी**

सिन्नर येथे राहणाऱ्या २३ वर्षीय महाभागाने प्रेम पाटील या बनावट नावाने इंस्टाग्राम अकाऊंट उघडले होते. त्याद्वारे त्याने अनेक महिला व मुलींना मैत्रीच्या जाळ्यात ओढले होते. आधी मैत्री व नंतर प्रेमाचे सोंग घेऊन बतावण्या करीत तो अश्लील फोटो व व्हिडिओ पाठविण्याची मागणी करायचा. प्रेमाच्या गोड भावनेत अडकून वाडा तालुक्यातील एका मुलीनेही त्याला आपले काही फोटो, व्हिडिओ पाठविले होते, मात्र याचा आंबटशौक वाढतच चालल्याने अधिक फोटो देण्यास या मुलीने नकार दर्शविला. आरोपीने पिडीत




मुलीला ब्लॅकमेल करुन अनेक ठिकाणी अश्लिल छायाचित्र पाठवून बदनामी करीन अशी धमकी तरीही फोटो पाठवण्यास नकार दिल्याने तिचे फोटो व व्हिडिओ इंस्टाग्रामवर फॉरवर्ड करून सदर मुलीचा विनयभंग केला म्हणून वाडा पोलीसात याविरोधात तक्रार दाखल करण्यात आली. पोलिस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे यांनी तात्काळ या भामट्याला सिन्नर येथून अटक केली असून अधिक चौकशी केली असता याने अनेक महिला व मुलींना अश्लील मॅसेज पाठवल्याचे निष्पन्न झाले. या आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले असता त्याला १५ सप्टेंबर पर्यत पोलीस कोठडी सुनावली असल्याचे किंद्रे यांनी सांगितले. सोशल मीडियाचा वापर करणाऱ्यांनी विशेषतः शाळा, कॉलेज मध्ये शिकणाऱ्या मुलींनी अधिक भावनिक व उत्साही न होता मोबाईलचा काळजीपूर्वक वापर करणे गरजेचे आहे. असे आवाहन वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे यांनी केले आहे.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**ई-निविदा सूचना क्रमांक ३६ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, पालघर हे खालील कामांच्या बी-१ नमुन्यातील सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील **नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता** यांच्याकडून मागवित आहेत. कोरे निविदा संच निविदा उपलब्ध कालावधी दिनांक १८/०९/२०२४ ते दिनांक २५/०९/२०२४ सकाळी ११.०० ते संध्या. ४.४५ वाजेपर्यंत (www.mahapwd.gov.in) या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहतील. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर हे भरन पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी उघडतील.

फटिप : सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०६ (सहा) कामे समाविष्ट आहेत. या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.gov.in 2) http://www.paytopwd.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रुपये लक्ष जी.एस.टी.वगळून | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | खामलोली येथील एकनाथ मेहेर ते विलास नाईक यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. ता.जि. पालघर | रु. ७९६८७०/- | २५१५- ग्रामविकास व पंचायत राज विभाग २०२४-२५ |
| २. | केळवा रोड येथील वृद्धाश्रम कडे जाणारा रस्ता तयार करणे. ता.जि. पालघर | रु. ७९७५९३/- | २५१५- ग्रामविकास व पंचायत राज विभाग २०२४-२५ |
| ३. | वाकसई ग्रामपंचायत बेंदरपाडा येथे रस्ता तयार करणे. ता.जि. पालघर | रु. ७९७५९३/- | २५१५- ग्रामविकास व पंचायत राज विभाग २०२४-२५ |
| ४. | चंद्रपाडा येथील खैरपाडा येथे रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. ता. वसई, जि. पालघर | रु. ८२३७१४/- | २५१५- ग्रामविकास व पंचायत राज विभाग २०२४-२५ |
| ५. | चंद्रपाडा येथील शुभांगी बेंद्रे यांच्या घरापासून ते राहुल म्हात्रे यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. ता. वसई, जि. पालघर | रु.८२०६८२/- | २५१५- ग्रामविकास व पंचायत राज विभाग २०२४-२५ |
| ६. | पाली येथील शशांक धोत्रे ते विल्सन डिसिल्वा यांचे घरापर्यंत बंदिस्त गटार बांधणे. ता. वसई, जि. पालघर | रु. ८२८६२९/- | २५१५- ग्रामविकास व पंचायत राज विभाग २०२४-२५ |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. १८/०९/२०२४ ते दि. २५/०९/२०२४ पर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. २७/०९/२०२४ सकाळी ११.०० नंतर शक्य झाल्यास.

जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/९२८७
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी,
पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर (पश्चिम) - ४०१ ४०४.
दिनांक : १०/०९/२०२४

**सही/-**
**(स.प्र. पाटील)**
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर

**जिमाका/पालघर/जाहि ८१/३८४/२०२४ दिनांक : ११/०९/२०२४**

पान १ वरून....

## मुलीचा संसार मोडताच तिचा बाप ...

चव्हाण आणि भीमाप्पा चव्हाण हे दोघे भाऊ, भाऊ आपल्या कुटूंबासह राहयला आहेत.त्याची वडिलार्जीत थोडीफार शेती ही आहे.या शेतीच्या वाटणीवरून त्याचा सख्खा भाऊ भीमाप्पा आणि विठ्ठल याचेत बऱ्याच वर्षापासून वाद चालू आहे. या कारणातून त्या दोघा भावाचे कधीच एकमेकांचे पटत नाही.त्याच्यात कायम भांडणे आणि मारामारी होत असल्याने त्या दोघात विस्तव ही जात नव्हता. ते दोघे ही एकमेकांना पाण्यात बघत होते. बऱ्याचदा त्या दोघांची भांडणे शेजाऱ्यांनी आणि पै पाहुण्यांनी सोडवली होती. तरी ही त्या दोघातील वाद काही केल्या मिटला नव्हता. त्यातच भीमाप्पा याच्या मुलीचे गावातीलच एका तरूणाबरोबर प्रेमप्रकरण सुरू होते. ते प्रेमप्रकरण भीमाप्पा आणि त्याच्या बायकोला माहित झाल्यावर त्यांनी आपल्या मुलीचे जातीतील मुलाबरोबर लग्न लावून देण्याचा विचार केला. त्यासाठी त्यांनी आपल्या पै पाहुण्याना, सर्वाना मुलीच्या स्थळाबाबत सांगून ठेवले. मुलीसाठी स्थळे येत असताना तिचे होणारे लग्न कोणत्या ना कोणत्या कारणातून मोडत होते. येणारे पाहुणे मुलगी बघून जात होते. मुलगी पसंत आहे असा निरोप ही त्याच्याकडून येत होता. परंतु लग्न जमविताना कोण तरी खोडा घालत होते. त्यामुळे काही केल्या त्या मुलीचे लग्न जमत नव्हते. त्यातच भीमाप्पा यांना मुलगीची चिंता सतावत होती. कधी एकदा तिचे लग्न जमते आणि आपल्या खांद्यावरचे ओझे कमी होते असे त्यांना झाले होते. आपली मुलगी दिसायला सुंदर आणि हुशार आहे तरी ही तिचे लग्न जमत नाही. त्यातच ती दुसऱ्या कोणाबरोबर पळून गेली तर काय करायचे म्हणून भीमाप्पा तिचे लग्न जमविण्याच्या नादात होते.पण लग्न काही जमत नव्हते. जमणारे स्थळ जमत नसल्याने यामागे काही तरी आहे. कुणी तरी आपल्या मागे आपल्या मुली विषयी अफवा पसरवित आहे अशी शंका त्यांना आली. याची त्यांनी सखोल चौकशी केली असता आपला भाऊ विठ्ठल हाच आपल्या मुलीविषयी चार पै-पाहुण्यात गैर समज पसरवित आहे तोच आलेल्या पाहुण्यांना वेगळे काही तरी सांगून स्थळांना खोडा घालत आहे याची पुरेपुर माहिती भीमाप्पा यांना मिळाली. ही माहिती मिळाल्यावर ते ही गप्प बसले नाहीत त्यांनी कुठले तरी भांडण उकरून काढून विठ्ठल याच्याबरोबर वाद घालून भांडण उकरून काढले. त्या भांडणात तु माझ्या मुलीचे लग्न मोडत आहेस. तुला काही लाज लज्जा शरम आहे का नाही असे म्हणून त्यांना मारहाण केली. त्या भांडणाचा विठ्ठल याने भीमाप्पाला तुझी मुलगी दुसऱ्याबरोबर शेण खाते त्यावेळी तुला लाज वाटत नाही का? तुझ्या मुलीमुळे आपल्या घराची बदनामी होत आहे आणि तु मला लाज शरमेची गोष्ट सांगतोस काय म्हणत त्यावेळी आपल्या दोन्ही मुलांना बोलावून घेऊन भीमाप्पाला लोळवले. त्याला ही त्या तिघांनी जबर मारहाण केली. कुठला वाद कुठे पोहचला होता. घरच्या मुलीच्या इज्जतीचा प्रश्न उभा राहिला होता. भीमाप्पाने आपल्याला मारहाण झाल्याची माहिती आपला मेहुणा लक्ष्मण फडतरे याला दिली. त्याला ही विठ्ठल हा आपल्या भाचीची बदनामी करीत आहे याचा राग आला. त्याने त्यावेळी कसे तरी आपल्या भावोजी बहिणीला शांत केले. काही तरी करून आपल्या भाचीचे लग्न जमवूया आणि मग विठ्ठलकडे बघुया असे सांगितले. यात काही महिने गेले. त्यानंतर भीमाप्पाच्या मुलीला लक्ष्मण फडतरे याच्या घरी दाखवायला सुरूवात केले. कसे तरी करून कोणाला काही न कळविता गेल्या चार पाच महिन्यापूर्वी त्यांनी त्या मुलीचे लग्न लावून दिले.लग्न लावून दिल्यानंतर महिना कसा तरी गेला असेल त्यातच ती मुलगी गर्भवती असल्याचे तिच्या सासरच्यांना समजले. यावरून त्या मुलीच्या सासरच्यांनी मुलीला आणि मुलीच्या आई वडिलांना मुलगी थोडयाचा दिवसात कशी काय गर्भवती राहिली.अजून लग्नाला दोन चार महिने ही झाले नाहीत तुमची मुलगी पोटुशी कशी काय? काय भानगड आहे. तुमच्या मुलीचे लग्ना अगोदर कोणाबरोबर तरी प्रेमसंबंध होते. ते लपवून तुम्ही आमच्या मुलाबरोबर तिचे लग्न जमवून दिले. तुम्ही आमची घोर फसवणुक केली आहे म्हणून ते भांडू लागले. गेल्या महिन्याभरापासून ती मुलगी आपल्या माहेरी कल्लोळ येथे आपल्या आई वडिलांच्या घरी राहयला आली.नवीन लग्न झालेली मुलगी माहेरी राहू लागल्याने गावत ही चर्चा सुरू झाली. यातच काडी पेटविण्याचे काम विठ्ठल याने केले. तो त्या मुली विषयी नको नको ती अफवा पसरवू लागला. ती मुलगी लग्ना अगोदर पोटुशी होती, त्यामुळे आपल्या भावाने समोरच्या पाहुण्यांना अंधारात ठेवून तिचे लग्न लावून दिले आहे असे तो सांगू लागला. आपल्या सख्खा पुतणी विषयी नको नको ते पै पाहुण्यात सांगून तो तिला व भीमाप्पाला बदनाम करीत होता. त्याने पसरवलेली अफवा त्या मुलीच्या सासरच्या लोकांच्या पर्यत पोहचली. त्याच्या हातात ही हे आयते कोलीत सापडले. त्यामुळे त्या पाहुण्यांनी भीमाप्पाला बोलावून तुम्ही आम्हाल फसविले आहे. लग्नाचा खर्च दया नाही तर आम्ही कोर्टात तुमच्या मुली विरूध्द आणि तुमच्या विरूध्द पसवणुकीची तक्रार दाखल करून केस घालतो असे सांगितले. आपल्या मुलीचे झालेले लग्न ही विठ्ठलमुळे मोडत आहे याचा राग भीमाप्पाला आला. तोच आपल्या मुलीविषयी गैरसमज पसरवून आपल्या मुलीची बदनामी करतो आहे याची त्यांना खात्री पटली. आता गप्प बसायचे नाही. त्याला कायमचा धडा शिकवायचा असा त्याने व त्याचा मेहुण्याने विचार केला. रविवार दि.१ सप्टेंबर २०२४ रोजी भीमाप्पा आणि त्याचा मेहुणा लक्ष्मण फडतरे यांनी फुल्ल दारू पिली. ते दोघे ही विठ्ठल याच्या दरवाज्यात येवून त्याला व त्याच्या बायकोला कन्नडमध्ये शिव्या देवू लागले. रात्रीचे ९ वाजले होते. त्यावेळी विठ्ठल हा घरीच होता. माझ्या मुलीची बदनामी करतोस काय?तुला जिवंत सोडत नाही, बायको जवळ कशाला लपून बसला आहेस बाहेर ये अशी चिथावणी त्या दोघांनी विठ्ठल याला दिली. तो ही त्यावेळी हातात काठी घेऊनच बाहेर आला. तो बाहेर आल्यावर विठ्ठल आणि त्याची दोन्ही मुले आणि भीमाप्पा त्याचा मेहुणा यांच्यात लाठी काठीने हाणामारी सुरू झाली. त्यावेळी विठ्ठल याच्या घरासमोर मोठी धुमचक्री उडाली.कोण कोणाला मारत आहे. बघणारे बघत होते. शिव्याची लाखोली दिली जात होती. त्यातच विठ्ठलने भीमाप्पाच्या डोक्यात काठी हाणल्यावर तो खाली पडला. त्याचवेळी भीमाप्पाच्या मेहुण्याने लोंखडी रॉड विठ्ठलच्या डोक्यात घातला.त्याचे डोके फुटले. तो रक्ताच्या थारोळ्यात पडल्यावर भीमाप्पाने उठून परत त्याला लाठीने मारायला सुरूवात केली. यात विठ्ठल हा जबर जखमी झाला. भीमाप्पाला आणि लक्ष्मणला ही थोडे फार लागले होते. त्यातच कुणी तरी गावात चालू असलेल्या मारामारी विषयी घटप्रभा पोलीसांना कळविले होते. पोलिसांची व्हॅन सायरन लावून गावात आल्यावर सगळीकडे पांगापांग झाली. जबर जखमी असलेल्या विठ्ठल चव्हाण याला पोलीसांनी उपचारासाठी घटप्रभा येथील सरकारी दवाखान्यात नेले. त्याच्या डोक्यावर लोंखडी रॉडने वार केले असल्याने त्याच्या डोक्याला मोठे भोक पडले होते. त्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू होता. डॉक्टरांनी त्याच्यावर वेळीच उपचार सुरू केले. त्याला अतिदक्षता विभगात ठेवण्यात आले. तेथे त्याच्यावर तीन चार दिवस उपचार सुरू होते. या दरम्यान भीमाप्पा चव्हाण आणि त्याचा मेहुणा लक्ष्मण यांना पोलीसांनी ताब्यात घेऊन त्याच्या विरोधात खुनी हल्ल्याचा प्रयत्न केला म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला. त्या दोघाच्यांकडे या घटनेची चौकशी करीत असताना बुधवार दि.४ सप्टेंबर २०२४ रोजी विठ्ठल चव्हाण याचा मृत्यु झाला. या घटनेची फिर्याद मयत विठ्ठल चव्हाण याच्या पत्नीने घटप्रभा पोलीसात केल्याने पोलीसांनी विठ्ठल गोविंदाप्पा चव्हाण (वय ५२) याच्या खून प्रकरणी भीमाप्पा गोविंदाप्पा चव्हाण, त्याचा मेहुणा लक्ष्मण फडतरे या दोघांच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) वाढवून त्याच्या विरोधात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीसांनी या दोघांना घटप्रभा येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने या दोघांची बेळगावी येथील हिडंलगा जेलमध्ये रवानगी केली. या दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली काठी आणि लोखंडी रॉड जप्त केला.या गुन्हयात आणखी कोणाचा सहभाग आहे का? याची चौकशी पोलीस करीत आहेत.या घटनेची माहिती प्रसारमाध्यमंना जिल्हा पोलीस प्रमुख डॉ.भीमाशंकर गुळेद यांनी दिली. त्याच्या मार्गदर्शनाखाली या घटनेचा पुढील तपास घटप्रभा पोलीस करीत आहेत. भाऊबंदकीचा तिढा हा कधीच सुटत नसतो. कुठला तरी वाद कुठे तरी नेऊन कोणाची तरी बदनामी केली जाते आणि त्यातच आपल्या विवाहित मुलीची आपलाच भाऊ बदनामी करीत असेल तर तो भाऊ ही कसा गप्प बसेल. त्यातूनच अशा घटना घडत असतात हेच या घटनेवरून दिसून येते.

## अनैतिक संबंधाचा अखेर भयंकर शेवट ...

होती. ती त्याच्या रिक्षातून कायम ये जा करीत असल्याने त्या दोघाची ओळख झाली. तिचे नाव शिवानी सुपेकर असे होते. तिचा ही नवरा काही महिन्यापूर्वी वारला असल्याने ती ही तशीच एकटी होती. शिवानी ही वडगाव मावळ येथे आपल्या आईसह राहयला आहे. शिवानीची पुरेपुर माहिती विनायक आवळे याने काढली होती. ती ही एकटीच राहत असल्याने त्याने तिच्याशी ओळख वाढविली. त्या ओळखीचे रूपांतर त्याच्या प्रेमात झाले. तो विवाहित आणि तिचा नवरा ही मयत झाला असल्याने दोघांनी ही एकमेकांची ती गरज ओळखून आपले संबंध वाढविले. ३०शीतील शिवानी ही दिसायला देखणी आणि मादक होती. कुणी ही तिच्या प्रेमात पडेल असे तिचे सौंदर्य होते.विनायक ही तिच्या प्रेमात पडला होता.खरे तर विनायक हा विवाहित पुरूष आहे हे तिला अगोदर माहित नव्हते.परंतु नंतर ज्यावेळी तिला त्याच्या विषयी समजले त्यावेळी ही तिने त्याबाबत कोणतेही आढेवेढे घेतले नाही.त्यामुळे त्याचे संबंध वाढीस लागायला वेळ लागला नाही. दोघांनी ही ती गरज ओळखूनच जवळीक निर्माण केले असल्याने त्याच्यात शारिरीक संबंध निर्माण व्हायला ही वेळ लागला नाही. हल्ली तो तिला आपल्या प्रवाशी रिक्षातून कुठे ही फिरवित होता. तिला काय पाहिजे काय नको ते तो पाहत होता. तिची प्रत्येक गरज तो पुर्ण करीत असल्याने ती ही त्याला पाहिजे तसे सुख देत होती. तो काय म्हणेल ती करीत होती.त्या दोघांच्या संबंधाची माहिती ही शिवानीची बहिण शारदा नवीन जोशी आणि तिच्या आईला ही होती. विनायक हा त्या दोघीच्या ही घराकडे ये जा करीत होता. त्यातच शिवानीची आई ही विनायकला आपला जावाईच मानत होती. त्या दोघांच्या संबंधाला शिवानीच्या आईची आणि तिच्या बहिणीची मुक संमती होती. हल्ली विनायक हा जास्तच दारू प्यायला लागला होता. त्याचे कामाकडे लक्ष नव्हते. त्यामुळे तो शिवानीला ही पैसे देत नव्हता. त्यामुळे त्या दोघात ही नेहमी भांडणे होऊ लागली होती. या भांडणात तो अलिकडे शिवानीच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागला होता. शिवानी ही त्याला अलिकडे फारसे किंमत देत नसल्याने तिचे बाहेर कुणाबरोबर तरी लफडे सुरू असल्याची त्याला खात्री झाली होती. कारण तो तिला भेटायला बोलविला किंवा त्याने तिच्याशी मोबाईलवर कॉन्टेक्स करण्याचा प्रयत्न केला तरी त्याचा मोबाईल ही उचलत नव्हती.त्यामुळे त्या दोघांची भांडणे विकोपाला गेली होती. या भांडणात कधी कधी विनायक हा तिला मारहाण ही करायला मागे पुढे पाहत नव्हता. त्या दोघांचे जरी बिनसले असले तरी तो मात्र तिच्याशी शारीरिक संबंध बनविण्यासाठी जबरदस्ती करीत होता. त्याला ती त्या कामासाठी पाहिजे असल्याने तो रात्री अपरात्री दारू पिऊन तिच्या घराकडे जाऊन तिच्याशी संबंध बनवित होता. त्याला माहित होते. तीचा नवरा मयत झाला असल्याने तिला ही याची गरज आहे त्यामुळे ती आपल्याला या कामासाठी नाही म्हणणार नाही याची खात्री त्याला होती. त्यातच तो तिच्या चारित्र्यावर संशय घेत असल्याने ती ही त्याच्या मागे तु माझ्याशी लग्न कर म्हणून मागे लागली होती. त्याला फक्त ती त्या कामासाठी पाहिजे असल्याने त्याला तिच्याशी लग्न करायचे नव्हते. त्यातच तिला पाच वर्षाचा मुलगा असल्याने त्याला त्या मुलाची जबाबदारी नको होती. म्हणून तिने लग्नाचा तगादा लावला की,तो काही ना काही कारण काढून तिच्याशी भांडण काढून तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता. त्याला कुणी कडून तरी लग्नाचा विषय टाळायचा होता. विनायक हा शिवानीवर नको नको ते संशय घेऊन तुझे अगोदर बाहेरचे लफडे बंद कर मग माझ्याशी लग्नाचा विचार कर असे सांगत होता. तो आपल्याला टाळत आहे, त्याला फक्त मी पाहिजे. माझे शरीर भोगायला पाहिजे त्याला माझ्या मुलाची जबाबदारी नको आहे हे शिवानीने ही ओखळले होते. त्या दोघांच्या भांडणात त्याच्या बहिणीने आणि आईने बऱ्याच वेळेला मध्यस्थी केली होती. परंतु तो कोणाचेच काही ऐकत नव्हता. त्याला फक्त शिवानीच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविणे इतकेच माहित होते. रात्री अपरात्री दारु पिऊन यायचे तिच्याबरोबर भांडण काढायचे आणि मग जबरदस्तीने तिच्याबरोबर शारीरिक संबंध बनावयचे एवढेच त्याला माहित होते.तो आपल्यावर जबरदस्ती करतो हक्क दाखवितो मग आपल्याशी लग्न का करीत नाही याचे कोडे ही शिवानीला पडले होते. त्या दोघांची भांडणे विकोपाला गेली होती. या भांडणाला तो ही वैतागलेला होता. तिने आपल्या मागे लावलेला लग्नाचा तगादा त्याला कायमचा नष्ट करायचा होता. त्यासाठी तो विचार करीत होता. तसा त्याचा स्वभाव थोडा सणकी आणि रागीट होता. रागाच्या भरात त्याच्या हातून नको ती गोष्ट घडत होती. त्याचा हा रागीट स्वभाव तिला ही माहित होता. तरी ही त्याच्या भांडणे होत होती. त्या भांडणात तो तिला तु माझी रखेल आहेस असे म्हणत होता. त्याचा सगळा मान अपमान ही ती सहन करीत होती. बुधवार दि.११ सप्टेंबर २०२४ रोजी ७च्या सुमारास जगताप नगर येथे शिवानीची आई राहत असलेल्या घराजवळ एका रिक्षात तिचा मृतदेह सकाळी फिरायला जाणाऱ्या लोकांना दिसला. सुरूवातीला बघणाऱ्यांना वाटत होते की रिक्षात कुणी तरी बाई झोपलेली आहे. परंतु जाणाऱ्या येणाऱ्यांनी जरा रिक्षात निरखून पाहिले तर त्या बाईची कोणतीच हालचाल होत नव्हती. त्या रिक्षातील बाई आणि ती रिक्षा बरेचजण ओळखत होते.ती रिक्षा कायम त्या परिसरात येत जात असल्याने काही ना त्या रिक्षाचा नंबर ही ओळखीचा वाटला.तर रिक्षातील बाई ही शिवानी सुपेकर असल्याचे काही जणांच्या लक्षात आल्यावर त्यांनी या घटनेची माहिती जवळच राहणाऱ्या तिच्या आईला व बहिणीला दिली. या घटनेची माहिती मिळताच तिची बहिण शारदा नवीन जोशी ही तातडीने घटनास्थळी आली.तिने शिवानीला हालवून उठविण्याचा प्रयत्न केला असता तिची कोणतीच हालचाल होत नव्हती. तिचा गळा कुणी तरी आवळल्याच्या खुणा दिसत होत्या. रिक्षाभोवती बघ्यांची गर्दी वाढली होती. कुणी तरी या घटनेची माहिती वाकड पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी पोहचले. पोलीसांनी घटनास्थळी पोहचून या घटनेची माहिती मयत शिवानीची बहिण शारदा जोशी हिच्याकडून घेतली. तिने पोलीसांना माहिती दिली की, मयत शिवानी ही काळेवाडी येथे राहत असलेल्या विनायक आवळे याच्या बरोबर लिव्ह इन रिलेशीनशीपमध्ये राहत होती.तो तिच्यावर नेहमी चारित्र्याचा संशय घेऊन तिला मारहाण करीत होता. तिच्याशी भांडण काढत होता. काल रात्री ही त्याने तिच्याशी या कारणातून भांडण काढून तिला मारहाण केल्याचे शिवानी हिने आपल्याला सांगितल्याचे तिने पोलीसांना सांगितले. बहुदा त्यानेच आपल्या बहिणीचा गळा आवळून खून केला आहे आणि तिचा मृतदेह त्याच्याच रिक्षात टाकून आपल्या आईच्या घराजवळ आणून ठेवला आहे आणि त्यानंतर तो तेथून पळून गेला आहे. तिने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी या घटनेचा पंचनामा करून मृतदेह वायसीएम रुग्णालयात पोस्टमार्टमसाठी पाठवून दिला. पोस्टमार्टम रिपोर्टमध्ये मयताचा श्वास गुदमरून मृत्यू असा उल्लेख असल्याने पोलीसांनी संशयीत विनायक आवळे याचा शोध सुरू केला. घटनेनंतर दोन दिवस फरार असलेला विनायक आवळे हा पोलिसांना सापडत नव्हता. पोलीस त्याचा शोध घेत असताना तो काळेवाडी येथील त्याच्या घरी शुक्रवार दि.१३ सप्टेंबर रोजी पोलिसांना मिळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन वाकड पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे मयत शिवानी सुपेकर हिच्या खूनाविषयी चौकशी केली असता तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल केला.मयत शिवानी हिचे आपल्या शिवाय इतर दुसऱ्या तरूणाबरोबर संबंध असल्याची माहिती आपल्याला मिळाली होती. या कारणातून तिचे आणि आपले घटनेच्या रात्री भांडण झाल्याने त्या भांडणात तिचा आपण रागाच्या भरात गळा आवळला असल्याचे सांगून त्याने आपला गुन्हा कबुल केला.त्याने गुन्हा कबुल केल्यावर या घटनेची फिर्याद मयत शिवानी हिची बहिण शारदा नवीन जोशी (वय ३०) हिच्या फिर्यादीवरून शिवानी सोपनाथ सुपेकर (वय २७) हिच्या खून प्रकरणी तिचा प्रियकर विनायक अनिल आवळे (वय ३५) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम १०३,(१) नुसार गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली रिक्षा जप्त केली. या घटनेचा पुढील तपास पो.निरी.निवृत्ती कोल्हटकर यांच्या मार्गदर्शनाखाली वाकड पोलीस करीत आहेत.

## फुलवालीच्या मागे लागला होता फुलवला...

त्यामुळे सुप्रिया वैतागली होती. त्यातच त्याने तिला अश्लील मॅसेज पाठवायला सुरुवात करताच तिने तिथेच दुसरा स्टॉल चालवणाऱ्या आमीर शेख याच्या मदतीने दामोदरचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. दामोदर कोडींबा पगडे ही व्यक्ती दादर येथील विजयकुमार दळवी नगर मध्ये आपल्या कुटुंबासोबत राहत होती. त्यांचा दादर या ठिकाणी एक स्टाल होता. त्यातून मिळणाऱ्या पैशातून ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असत. मात्र दिनांक २६ आगस्ट रोजी दामोदर पगडे हे अचानक बेपत्ता झाले. त्यांचा कुटंबातील सदस्यांनी खूप शोध घेतला परंतु ते मिळून आले. ३० ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास मुंब्रा पोलीस स्टेशन हद्दीतील आनंद कोळीवाडा परिसरातील लक्ष्मी निवास इमारत ए विंग चे ४ मजल्यावर एका कोपऱ्यात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत मिळून आला होता. या घटनेची माहिती इमारतील रहिवाशांनी मुंब्रा पोलिसांना दिली. मुंब्रा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे, पोलीस निरीक्षक नितीन पगार (प्रशा), पोलीस निरीक्षक राजू पाचोरकर (का.व सु.), सपोनिरी अजय कुंभार, उमेश कोरडे, हे तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळी पडलेल्या मृतदेहाचा पंचनामा करून या प्रकरणी मुंब्रा पोलिसांनी प्रथम अकस्मात मृत्यु नोंद क्र. २९६/२०२४ भारतीय नागरीक सुरक्षा अधि. १९४ प्रमाणे दाखल केला. त्यानंतर तो अनोळखी मृतदेह कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. ३१ आगस्ट रोजी मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. त्यावेळी वैद्यकिय अधिकारी यांना मयताचे अंगावर कोणत्यातरी धारदार हत्याराने गळ्यावर, छातीवर, पाठीवर जखमा असल्याचे दिसून आले. त्यामुळे हा नैसर्गिक मृत्यू नसून शरीरावर झालेल्या जखमांमुळे त्याचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पोलिसांना सांगितले. म्हणजे हा खुनाचा गुन्हा असल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिसांनी प्रथम मृतक व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी प्रयत्न सुरू केले. घटनास्थळावर आरोपीने कोणताही पुरावा सोडला नसल्याने आरोपी निष्पन्न करण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर निर्माण झाले होते. या गुन्ह्याचे तपासकामी स्वतंत्र पथक नेमुन मयताचे मोबाईल नंबरचे सीडीआर/एसडीआर प्राप्त करून तांत्रिक विश्लेषण केले असता मृतक हा दादर येथील रहिवासी असल्याचे समजले.पोलिसांनी मयताचे कुटूंबियांचे घर गाठले. त्यांना सर्व माहिती दिली.त्यानंतर मयताचा मोठा भाऊ बाळु कोंडीबा पगडे याला रुग्णालयात घेऊन जाऊन पोलिसांनी तो मृतदेह दाखविला असता,तो त्यांचा भाऊ दामोदर कोडींबा पगडे रा. विजयकुमार दळवी नगर, दादर, मुंबई येथील रहिवासी असल्याचे सांगितले. आता पोलिसांनी बाळु कोंडीबा पगडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद क. १८३६/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), २६८,६१ (२), ३११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.आणि आरोपी चा शोध सुरू केला. घटनास्थळावर आरोपीने कोणताही पुरावा सोडला नसल्याने आरोपी निष्पन्न करण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर निर्माण झाले होते. या गुन्ह्याचे तपासकामी स्वतंत्र पथक नेमुन मयताचे मोबाईल नंबरचे सीडीआर/एसडीआर प्राप्त करून तांत्रिक विश्लेषण केले.तेव्हा मृताचे व्हॉट्सअप कॉलव्दारे कोणाच्या तरी संपर्कात असल्याचे दिसुन आले. त्यानुसार मयताचे कुटूंबियांकडुन माहिती घेवुन दादर रेल्वे स्टेशन ते मुंब्रा रेल्वे स्टेशन परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी केली असता एक अनोळखी संशयीत महिला व पुरुष मयतास मुंब्रा रेल्वे स्टेशनच्या बाहेर भेटल्याचे दिसुन आले. त्यानुसार २ सप्टेंबर २०२४ रोजी गुप्त बातमीदार यांना संशयीत महिला व पुरुष यांचे फुटेज दाखवुन ओळख पटवण्यात आली. त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे व संशयीत महिला व पुरुष यांचे मोबाईलचे तांत्रिक विश्लेषणावरून शोध घेतला असता, मुंब्रा रेल्वे स्टेशन परिसरातील ख्वाजा पॅलेस इमारतीत महिला सुप्रिया मच्छीद्र वाघमारे (वय २६) राह. विजयकुमार दळवी नगर, दादर, मुंबई) व आमीर नुरमोहम्मद शेख (वय ३३) राह. ख्वाजा पॅलेस, मुंब्रा, ठाणे हे मिळुन आले. त्यांना चौकशी कामी पोलीस स्टेशनमध्ये आणुन गुन्ह्याचे अनुषंगाने सखोल चौकशी केली असता त्यांनी पूर्ववैमनस्यातून हा गुन्हा केल्याची कबुली दिली. दरम्यान या दोन्ही आरोपींना अटक करून पोलीस कोठडी तपासादरम्यान आरोपींतांकडुन मयताचा मोबाईल, सोन्याची अंगठी तसेच गुन्हयात वापरलेले हत्यार जप्त करण्यात आले आहेत. परंतु ही हत्या या दोघांनी का केली याबाबत अधिक चौकशी केली असता, वेगळी हकींगत पुढे आली. मयत दामोदर कोडींबा पगडे रा. विजयकुमार दळवी नगर, दादर, मुंबई यांचा दादर च्या फुल मार्केटमध्ये फुलांचा स्टोल आहे. याच ठिकाणी सुप्रिया मच्छीद्र वाघमारे (वय २६) राह. विजयकुमार दळवी नगर, दादर, मुंबई हिच्या वडिलांचा फुलांचा स्टॉल आहे. वडील वारल्याने सुप्रिया ही वडीलांचा स्टॉल चालवत होती.तिच्या बाजूला आमीर नुरमोहम्मद शेख (वय ३३) राह. ख्वाजा पॅलेस, मुंब्रा,जिल्हा ठाणे याचा बेल्टचा स्टॉल आहे. त्यामुळे या दोघांची ओळख झाली.परंतु मयत दामोदर पगडे हा सुप्रिया हिला अश्लील मेसेज पाठवून त्रास देत होता. तिच्या सोबत प्रेमसंबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत होता. मात्र सुप्रिया हिला हे पसंद नव्हतं. ती दामोदर याचा तिरस्कार करत होती. परंतु तो काही तिचा पिच्छा सोडायला तयार नव्हता. त्यामुळे ती दामोदरच्या या हरकतीमुळे वैतागली होती. दामोदर चा बंदोबस्त करण्यासाठी तिने ही गोष्ट आमीर नुरमोहम्मद शेख याला सांगितली. तो तयार झाला. दोघांनी मिळून बेत आखून दामोदर याला २६ तारखेला आमिष दाखवून मुंब्रा या ठिकाणी बोलावून घेतलं. त्यानुसार दामोदर त्या ठिकाणी आला. त्याला या प्लान बदल काही कल्पना नव्हती. दामोदर बेसावध असताना या दोघांनी मुंब्रा पोलीस स्टेशन हद्दीतील आनंद कोळीवाडा परिसरातील लक्ष्मी निवास इमारत ए विंग चे ४ मजल्यावर एका कोपऱ्यात त्याच्यवर धारदार शस्त्राने वार करून खून केला. तो मृतदेह तेथेच सोडून पळ काढला, अशी माहिती दिली. पोलिसांनी ४८ तासात हा खुनाचा गुन्हा उघडकीस आणून या दोघांना या गुन्हयात अटक केली. या गुन्ह्याच्या तपासात पोलीस सह आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त, विनायक देशमुख, पोलीस उप आयुक्त, सुभाषचंद्र बुरसे, सहाय्यक पोलीस आयुक्त, कळवा विभाग, उत्तम कोळेकर यांनी दिलेल्या सुचना व आदेशाप्रमाणे मुंब्रा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे, पोलीस निरीक्षक नितीन पगार (प्रशा), पोलीस निरीक्षक राजू पाचोरकर (का.व सु.) यांचे मार्गदर्शनाखाली सपोनिरी अजय कुंभार, उमेश कोरडे, पोहवा. रहिश जाधव, अजिज तडवी, पोशि.कृष्णा आव्हाड व अजिंक्य महाडीक यांनी केला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक नितीन पगार (प्रशा) हे करीत आहेत.

## सराईत गुन्हेगारांना पैशांचा मोह...

उत्तर प्रदेशच्या गोरखपूरमधून दोन आरोपींना ताब्यात घेऊन अटक केल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे. पोलिसांनी रोख रक्कम, हिऱ्याची अंगठी व महागडे घड्याळ असा १५ लाख १७ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. उल्हासनगरच्या आर्केट बिल्डिंगमध्ये राहणारे पेट्रोल पंपमालक रामचंद्र काकराणी (७५) यांची त्यांच्या कारमध्ये रूमालाने गळा आवळून हत्या केलेला मृतदेह २५ ऑगस्टला दुपारी मुंबई अहमदाबाद महामार्गावरील वसई फाटा येथे सापडला होता. जबरी चोरी करण्याच्या उद्देशाने अपहरण करून हत्या केल्याच्या गंभीर गुन्ह्याची उकल करण्यासाठी वरिष्ठांनी दिलेल्या सूचनेनुसार युनिट दोन आणि मध्यवर्ती गुन्हे शाखेने वेगवेगळी पथके तयार केली. रामचंद्र काकराणी यांचा कार चालक मुकेश खूबचंदाणी (५८) याचेसह साथीदार रामलाल यादव (२२) व अनिल राजकुमार उर्फ नेपाल उर्फ सहानी उर्फ थापा (३२) यांनी ही हत्या केली आहे. हे तिघे मागील सात महिन्यापासून हत्येचे प्लॅनिंग करत होते. १० लाखांची अंगठी व ५ लाखांचे घड्याळ विकण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाल्यावर गोरखपूर येथे सापळा रचून नेपाळला पळून जाण्याच्या तयारीत असताना आरोपी मुकेश आणि अनिल उर्फ थापा यांना अटक केली आहे. तर फरार आरोपी रामलाल यादवचा शोध घेत आहेत. आरोपी चालक मुकेश खूबचंदाणी याच्यावर मुंबईत याआधी ६ गुन्हे दाखल आहेत. तिन्ही आरोपी वसई फाट्यावरून विरार फाट्यापर्यंत रिक्षाने, विरार फाट्यावरून तलासरीपर्यंत मेटा ट्रॅव्हल्सने पळाले. तेथून पायी गुजरात बार्डर क्रॉस केली व नंतर बसने अहमदाबाद -दाऊद - इंदोर - झासी - कानपूर - नेपाळ बॉर्डर पर्यंत पळाले होते. वरील कामगिरी पोलीस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट दोनचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, मध्यवर्ती शाखेचे पोलीस निरीक्षक राहुल राख, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुहास कांबळे, नितीन बेंद्रे यांच्यासह पथकाने केली आहे. पोलिसांनी दिलेली माहिती की, आरोपी मुकेश खुबचंदानी हा सराईत गुन्हेगार आहे. त्याच्यावर यापूर्वी चोरीसह सहा गंभीर गुन्ह्यांची विविध पोलीस ठाण्यांची नोंद आहे. तो सहा महिन्यांपूर्वीच खाकराणी यांच्याकडे कामाला लागला होता. तुरूंगात असताना त्याची ओळख नेपाळचा रहिवाशी असलेल्या अनिल थापा आणि रामलाल यादव याच्याशी झाली होती. एकदा ते नेपाळच्या लुंबिनी येथे फिरायला गेले असताना खुबचंदानी याने चोरीची योजना सांगितली आणि मग कट रचला. २५ ऑगस्ट रोजी रामचंद्र खाकराणी हे विरार मधील पेट्रोलपंपावर आले होते. संध्याकाळी ४ वाजता ते चालक मुकेशसह उल्हासनगर येथील घरी जायला निघाले. वाटेत ठरल्या योजनेनुसार मुकेशचे साथीदार अनिल थापा आणि रामलाल यादव हे मांडवी येथे गाडीत चढले. गाडीत त्यांनी गळा दाबून खाकराणी यांची हत्या केली आणि त्यांचे तोंड बांधून गाडीत मृतदेह टाकून पसार झाले. मुकेशने आपल्या मोबाईलमधी सीम कार्ड काढून फेकले होते. आपण नेपाळला गेल्यावर पकडले जाणार नाही, याची त्यांना खात्री होती. मात्र पोलिसांनी त्यांचा माग काढत अटक केली.

क्राईम Reporter
क्राईम संध्या सप्ताहिक आता लवकरच
पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर
प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या
शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.
9890718873

16 TO 22 SEPTEMBER 2024 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 9/14/2024 8:54 PM Page 1



# जामनेर ग्रामस्थांचा रोष अन् गिरीश महाजनांनी काढला पळ!

**जळगाव/सुदाम चव्हाण**

राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन हे भारतीय जनता पक्षाचे बडे नेते आणि संकटमोचक म्हणून ओखळले जातात. राजकीय पेच, आंदोलने, नाराजीनाट्य असो किंवा विरोधकांची कोंडी करायची असो गिरीश महाजन आपल्या चातुर्याने सर्वांवर मात करतात. म्हणूनच भारतीय जनता पक्षाचे संकटमोचक अशी त्यांची खास ओळख आहे. मात्र सध्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ चांगलाच व्हायरल होत आहे. ज्यामध्ये संकटमोचक गिरीश महाजन यांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागले अन् थेट दुचाकीवर बसून पळ काढावा लागला.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, भाजप नेते गिरीश महाजन हे जळगावमधील जामनेर मतदारसंघाचे नेतृत्व करतात. दोन दिवसांपूर्वी ते जामनेर तालुक्यातील लिहा तांडा येथे कार्यक्रमासाठी गेले होते. यावेळी या गावातील रस्त्यांची स्थिती फारच वाईट असल्याचे निदर्शनास आले. यावरुनच गिरीश महाजन यांना स्थानिक तरुणांनी जाब विचारला. तरुणांचा हा आक्रमकपणा पाहून गिरीश महाजन यांनी कोणतेही उत्तर न देता दुचाकीवर बसून त्या ठिकाणाहून काढता पाय घेतला, ज्याचा व्हिडिओ सध्या माध्यमांवर व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये तुम्ही पाहू शकता की, ग्रामविकास मंत्र्यांच्या जामनेर मतदार संघामधील रस्त्यांची फारच वाईट स्थिती दिसून येत आहेत. याच खराब रस्त्यांबाबत गावातील तरुण त्यांना जाब विचारतांना दिसत आहेत. मात्र, गिरीश महाजन त्यांना उत्तर न देता दुचाकीवर बसून याच चिखल असलेल्या खराब रस्त्यातून वाट काढत निघून जातात.

गिरीश महाजन यांच्या या कृतीवरुन स्थानिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांना तरुणांनी विचारला जाब जामनेर तालुक्यातील लिहा तांडा येथे भंडाऱ्यानिमित्त गिरीश महाजन आले असता गेल्या ३० वर्षापासून आम्ही तुम्हाला निवडून देत आहोत तरी आमच्या गावातील रस्त्यांची अशी दुरावस्था का? असे विचारले असता मंत्री महोदयांनी ग्रामस्थांच्या प्रश्नाचे उत्तर न देता तेथून पळ काढला' जामनेर तालुक्यात एकच चर्चा. असे म्हणत ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी हा व्हिडिओ आपल्या फेसबूक अकाउंटवर शेअर केला आहे.

# महेश अर्बन को-ऑप बँकेच्या विस्तारित वास्तुचे भूमीपूजन



**लातूर/प्रतिनिधी**

महेश अर्बन को-ऑप बँक आहमदपूरच्या लातूर विभागीय कार्यालयाच्या मुख्य इमारती जवळ नवीन विस्तारीत वास्तुचा भूमीपूजन समारंभ बँकेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी मंत्री बाळासाहेब जाधव यांच्या हस्ते व बँकेचे ज्येष्ठ संचालक आमदार बाबासाहेब पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी (ता. १२) रोजी कामदार रोड येथे उत्साहात संपन्न झाला. यावेळी बँकेचे उपाध्यक्ष निवृत्तीराव कांबळे व इतर मान्यवर उपस्थित होते. महेश अर्बन को. ऑप बँकेच्या लातूर येथील विभागीय कार्यालय व मुख्य शाखेच्या सुसज्ज इमारती लगत कामदार रोड, लातूर परिसरात या वास्तूचा विस्तार करण्यात येणार असून या कामाचे भूमीपूजन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमास डी.एन. शेळके, सुनिल पडिले, ज्ञानोबा पिनाटे, ॲड. मंगेश महींद्रकर, गंगाधर कासले, संचालक ॲड. विनायक भोसले, शिवानंद हेंगणे, सतीशराव कल्याणी, पुरुषोत्तम पुरोहित, ॲड. सादीक शेख, अक्षय धुत्त, व्यवंस्थापक प्रशांत मांडवकर, बालासाहेब जाधव तसेच बँकेचे अधिकारी, कर्मचारी, ग्राहक, ठेवीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन सहा. व्यवस्थापक एस.एस. रंदाळे यांनी केले.

# एसटी महामंडळ ९ वर्षानंतर प्रथमच नफ्याच्या महामार्गावर

**मुंबई/प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांपासून आर्थिक संकटाचा सामना करणारी एसटी ९ वर्षानंतर प्रथमच नफ्याच्या महामार्गावर धावू लागली आहे. आर्थिक संकटामध्ये रूतलेल्या एसटीने आता भरारी घेतली असून महामंडळाची आर्थिक घोडदौड सुरू झाली आहे. ऑगस्ट महिन्यात ३१ विभागांपैकी २० विभागांनी नफा कमवला आहे. या महिन्यात एसटी महामंडळाला १६ कोटी ८६ लाख ६१ हजार रुपये इतका नफा झालेला आहे.

तब्बल ९ वर्षांनी एसटी महामंडळ नफ्यात आल्याने उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करीत भविष्यातही प्रयत्नांची पराकाष्टा करून महामंडळ सातत्याने नफ्यात येईल, असे प्रयत्न करण्याचे आवाहनही केले आहे. मागील काळात दोन वर्ष कोरोना महामारी आणि त्या पाठोपाठ सहा महिने कर्मचाऱ्यांचा चाललेला दीर्घकालीन संप यामुळे एसटी महामंडळ आर्थिक दृष्ट्या डबघाईला आले होते. मे २०२२ पासून एसटीची सुरळीत वाहतूक सेवा सुरू झाली. तथापि, एसटीचा घटलेला प्रवासी पुन्हा एसटीकडे वळविणे हे मोठे आव्हान होते. यावेळी राज्य शासनाने ७५ वर्षावरील ज्येष्ठांना सर्व प्रकारच्या बसमधून मोफत प्रवास व सर्व महिलांना एसटीच्या प्रवासी तिकिटात ५० टक्के सवलत या दोन योजना सुरू केल्या, की ज्यामुळे एसटीच्या प्रवासी संख्येत भरघोस वाढ झाली. सध्या सरासरी ५४ लाख प्रवासी एसटीतून दररोज प्रवास करीत आहेत. याबरोबरच एसटी प्रशासनाने गेल्या वर्षभरात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बस स्थानक अभियान, विद्यार्थ्यांना शाळेत थेट पास, प्रवासी राजा दिन, कामगार पालक दिन, श्रावणात एसटी संगे तीर्थाटन, असे अनेक अभिनव उपक्रम राबविले. तसेच जे विभाग गेली कित्येक वर्ष तोट्यामध्ये आहेत, त्या विभागांना मार्गदर्शन करण्यासाठी मध्यवर्ती कार्यालयाकडून पालक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली गेली. स्थानिक पातळीवर आगारनिहाय कर्मचारी व अधिकारी यांच्या बैठका घेण्यात आल्या. तोट्याच्या मार्गावरील बस फेऱ्या बंद करून, त्या ज्या मार्गावर प्रवासी जास्त आहेत तेथे वळविण्यात आल्या. याच बरोबर नादुरुस्ती बसेसचे प्रमाण १२ टक्क्यांवरुन ६ टक्के झाले. मागील वर्षाच्या तुलनेमध्ये ते निम्याने कमी करण्यात आले. तसेच चालक व यांत्रिकी कर्मचाऱ्यांचे सातत्याने प्रबोधन करुन डिझेलची खपत ०.५२ कि.मी.ने वाढविण्यात आले. त्यामुळे डिझेलची बचत झाली आहे. या सर्व प्रयत्नांचा एकत्रित परिपाक म्हणून ऑगस्ट महिन्यामध्ये एसटी महामंडळाला १६ कोटी ८६ लाख ६१ हजार इतका नफा प्राप्त झालेला आहे. भविष्यात येऊ घातलेल्या स्व: मालकीच्या बसेस व भाडेतत्वावरील बसेस एसटीच्या ताफ्यात सामील झाल्यानंतर त्याचा योग्य विनियोग करुन एसटी महामंडळ सातत्याने फायद्यात राहील यासाठी कृतीशील आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी केली जाईल. जेणेकरुन एसटीला गतवैभव प्राप्त होईल, असा विश्वास एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी व्यक्त केला आहे.

# रिक्त पदावर सामावून घेण्यासाठी डीएड आणि बीएड अर्हताधारक शिक्षकांचे ठिय्या आंदोलन!



**पालघर/प्रतिनिधी**

डीएड, बीएड अर्हता धारक शिक्षकांना २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये तात्पुरती सेवा (कंत्राटी) पद्धतीत सामावून घ्यावे असा शासन निर्णय ५ सप्टेंबर रोजी पारित झाला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील या शिक्षकांना शिक्षकांच्या रिक्त पदावर लवकरात लवकर सामावून घ्यावे, यासाठी डीएड बीएड अर्हताधारक उमेदवारांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन केले. सुमारे ३०० पेक्षा जास्त उमेदवार सकाळी साडेदहा वाजल्यापासून जिल्हा परिषदेच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ ठिय्या मारून बसले होते. दुपारी शिक्षणाधिकारी शेषराव बढे यांच्याशी चर्चा झाल्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वतीने बढे यांनी अर्हताधारक शिक्षकांचे निवेदन स्वीकारले. तसेच शासनाकडे याबाबतचे म्हणणे पोहोचण्यात येईल, असेही यावेळी बढे यांनी या उमेदवारांना सांगितले. गेल्या वर्षभरापासून डीएड, बीएड अर्हताधारक शिक्षक जिल्हा परिषदेतील शाळांमध्ये रिक्त असलेल्या पदासाठी सामावून घ्यावे, यासाठी विविध प्रकारची आंदोलने करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत आहेत. बेरोजगारांची यादीत हे शिक्षक उमेदवार असून पालघर येथे यायचे झाल्यास कोणाकडे तरी उसने पैसे घेऊन त्यांना पालघर गाठावे लागत आहे. इतकी वाईट परिस्थिती या उमेदवारांची झाली आहे. कोणतेही निकष न सुचवता त्यांना अपात्र करण्यात आले आहे, असाही आरोप त्यांनी आपल्या निवेदनात केला आहे. २०२३ च्या ऑक्टोबर महिन्यात दहा दिवसांचे त्यांनी उपोषण केले. त्यानंतर शासन स्तरावर बैठक घेऊन याबाबत निर्णय घेण्यात येईल, सांगण्यात आले. नंतर कुठल्याही प्रकारचा निर्णय घेण्यात आला नाही असेही त्यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी १ ऑगस्ट २०२४ रोजी अन्न पाणी त्याग आंदोलन करण्यात आले. मात्र एक महिना उलटून गेल्यावर सुद्धा याबाबत कुठलाही निर्णय घेण्यात आला नाही.

# चोरट्याकडून १३ मोबाईल फोन, रोख रक्कम असा ९२ हजारांचा मुद्देमाल जप्त



**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

काशीगाव पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी घरफोडी करून चोरी करणाऱ्या सराईत आरोपीला अटक करत रोख रक्कम आणि १३ मोबाईल फोन असा एकूण ९२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यानंतर मांडवी पोलीस ठाण्याचे दोन आणि मीरारोड पोलीस स्थानकाचा एक असे तीन गुन्हे आणि काशिगाव पोलीस ठाण्यातील एक गुन्हा अशा चार गुन्ह्यांची उकल करून त्या सराईत आरोपी अटक करण्यात आली आहे. काशीगाव पोलीस ठाणे हद्दीत ८ सप्टेंबर रोजी हरिम नबी अन्सारी (रा.मांडवी पाडा) यांनी घरफोडीची तक्रार दिली होती. तक्रारीनुसार सकाळी ते त्यांच्या राहत्या घरी झोपेतून उठले असता त्यांना त्यांचा मोबाईल फोन बिछान्यात मिळून आला नाही. तसेच त्यांच्या पत्नीचा देखील फोन गायब होता. त्यानंतर त्यांनी तक्रार दाखल केली होती. सीसीटीव्ही फुटेज आणि मोबाईल तांत्रिक विश्लेषणातून आरोपी अब्दुल रेहमान ताहीर बडु,याला अटक करण्यात आली. सदरची कारवाई ही मीरा भाईंदरचे पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. विजय मराठे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुलकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अभिजित लांडे व अंमलदार यांनी केली आहे.


**जिल्हा परिषद, पालघर**
**बांधकाम विभाग, मुख्यालय जव्हार**
**जिल्हा परिषद, पालघर**
**E-Procurement निविदा सूचना क्रमांक १२, १३ व १४**

ई-निविदेद्वारे निविदा सूचना क्रमांक १२, १३ व १४ सन २०२३-२४ अन्वये बांधकाम विभाग जिल्हा परिषद, पालघर यांच्या अधिनिस्त कामे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता
बांधकाम विभाग, मुख्यालय जव्हार
जिल्हा परिषद, पालघर

सही/-
अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, पालघर



क्राईम Reporter 9890718873

क्राईम संध्या सप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.


# कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित केलेल्या २४५ ग्राहकांच्या घरात परतला 'प्रकाश'

**वसई/प्रतिनिधी**

वीजबिल थकबाकीमुळे वीजपुरवठा कायमस्वरुपी खंडित केलेल्या कल्याण परिमंडलातील २४५ ग्राहकांची घरे प्रकाशाने पुन्हा उजळली आहेत. या ग्राहकांनी व्याज व विलंब आकार शंभर टक्के माफीसह किमान ३० टक्के थकबाकी भरणाऱ्यांना त्वरित वीजजोडणीची संधी देणाऱ्या महावितरण अभय योजना-२०२४ चा लाभ घेत ही संधी साधली. १ सप्टेबरपासून या योजनेची सुरुवात झाली असून परिमंडलातील २ लाख ९४ हजार ९१ घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांना कायमस्वरुपी खंडित झालेला वीजपुरवठा पूर्ववत करण्याची संधी यातून मिळणार आहे. परिमंडलातील ३८९ ग्राहकांनी आत्तापर्यंत या योजनेचा लाभ घेतला असून उर्वरित ग्राहकांनीही योजनेत सहभागी होण्याचे आवाहन मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा यांनी केले आहे. अभय योजनेनुसार मार्च-२०२४ अखेर किंवा तत्पूर्वी वीजपुरवठा कायमस्वरुपी खंडित झालेले लघुदाब व उच्चदाब ग्राहक (सार्वजनिक



पाणीपुरवठा व कृषीपंप ग्राहक वगळून) योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत. थकबाकीची मुळ रक्कम एकरकमी किंवा सहा समान हप्त्यात भरल्यास त्यावरील व्याज आणि विलंब आकार पुर्णतः माफ़ होईल. योजनेतील सहभागी ग्राहकांना एकरकमी किंवा सहा समान हप्त्यात मूळ थकबाकी भरण्याचा पर्याय उपलब्ध आहे. तर थकबाकी एकरकमी भरणाऱ्या उच्चदाब ग्राहकांना मूळ थकबाकीवर ५ टक्के आणि लघुदाब ग्राहकांना १० टक्के अतिरिक्त सवलत मिळणार आहे. मूळ थकबाकी एकरकमी अथवा ३० टक्के रक्कम भरुन योजनेत सहभागी होता येईल. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यकतेनुसार तत्काळ नवीन वीजजोडणी मिळेल. ३० टक्के रक्कम भरणाऱ्या ग्राहकांना मूळ थकबाकी व्याजमुक्त अशा सहा समान हप्त्यात भरण्याची सवलत उपलब्ध आहे. कल्याण परिमंलातील २ लाख ९४ हजार ९१ ग्राहक या योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत. योजनेत सहभाग घेत या ग्राहकांना विलंब आकाराचे ३ कोटी ८१ लाख व व्याजाचे ४० कोटी ६१ लाख रुपयांची सवलत मिळवण्याची संधी आहे. त्यासाठी पात्र ग्राहकांनी हीींिः//ीी.ारहरवळीलो.ळप/ीी/ीी या पोर्टलवर केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावयाचा आहे. याशिवाय महावितरणच्या स्थानिक कार्यालयांमध्ये इच्छुक ग्राहकांना ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. थकबाकीपोटी कायमचा वीजपुरवठा खंडित झालेल्या संबंधित ग्राहकांनी अधिकाधिक संख्येने या योजनेत सहभागी होण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# डहाणूत नळाला फेसाळ पाणी



डहाणू : डहाणू तालुक्यातील रामपूर ग्रामपंचायत हद्दीत पुरवठा होत असलेल्या नळांना सध्या फेसाळ पाणी येत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पाण्याच्या गुणवत्तेविषयी ग्रामस्थांमध्ये चिंता व्यक्त होत असून, जलप्रदूषणाची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्लाटपाडा परिसरातील ग्रामस्थांनी नळांना फेसाळ पाणी येत असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. या पाण्यामुळे आरोग्याच्या बाबतीत भीती निर्माण झाली आहे. पाण्याला फेस आल्यामुळे जलप्रदूषणाच्या शक्यतेची चर्चा होत आहे. त्यामुळे पाण्याचा स्त्रोत तपासण्याची व जलवाहिनीची तातडीने पाहणी करण्याची मागणी ग्रामस्थांकडून जोर धरली आहे. ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली असून, संबंधित अधिकार्यांनी जलप्रदूषणाची कारणे शोधून त्वरित उपाययोजना करावी, असे आवाहन केले आहे. ग्रामसेवक निलेश जाधव यांनी या समस्येवर त्वरीत तपास सुरू केल्याची माहिती दिली आहे. संपूर्ण जलवाहिनीची तपासणी केल्यानंतरच योग्य निष्कर्ष काढता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

# दोन वर्षांच्या मुलीचे अपहरण अन् निर्जनस्थळी नेत नराधमाचे दृष्कृत्य!

**कल्याण/प्रतिनिधी**

टिटवाळ्यात दोन वर्षांच्या मुलीचे अपहरण करत ३५ वर्षीय व्यक्तीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी शुक्रवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल होताच टिटवाळा पोलिसांनी काही वेळातच या नराधमाला बेड्या ठोकल्या. सोमनाथ ठाकरे असे त्याचे नाव आहे. टिटवाळा परिसरातील एका गावात पीडित मुलगी कुटुंबासह राहते. सोमनाथही याच परिसरात राहतो. गुरुवारी दुपारी घराबाहेरील अंगणात खेळत असताना सोमनाथने तिचे अपहरण केले. यानंतर निर्जनस्थळी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर तिला तिथेच सोडून त्याने पळ काढला. बराच वेळाने पालकांना मुलगी अंगणात नसल्याचे दिसताच तिची शोधाशोध सुरू झाली. त्यावेळी ती निर्जनस्थळी रडताना आढळली. याप्रकरणी पालकांच्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करत पोलिसांनी सोमनाथला शेजारच्या गावातून ताब्यात घेतले. त्याला कल्याण न्यायालयासमोर हजर केले असता, ६ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

पनवेल भागात राहणाऱ्या २५ वर्षीय तरुणाने शाळकरी मुलीचा विनयभंग केल्याची घटना उघडकीस आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे पीडित मुलीच्या आई-वडिलांनी याबाबत शाळेत तक्रार केल्यानंतर या तरुणाने गावात जाऊन तिला मारहाण केली व कुटुंबीयांना धमकावल्याचा आरोप आहे. पोलिसांनी त्याच्याविरोधात विनयभंगासह पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

# जिल्ह्यात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांचे तत्काळ पंचनामे करावे; आमदार निलंगेकरांची निवेदनाद्वारे मागणी



**लातूर/प्रतिनिधी**

निलंगा विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यात गत काही आठवड्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी व सततचा पाऊस झाला आहे. या पावसामुळे सोयाबीनसह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असून काही पिकांवर रोगांचाही प्रादुर्भाव झाला आहे. या परिस्थितीमुळे शेतकजयांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला आहे. परिणामी शेतकरी हतबल झाला असून आता त्यांना आधारासह मदतीची गरज आहे. त्यामुळेच नुकसान झालेल्या पिकांचे सरसकट तत्काळ पंचनामे करून त्यांना आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्यासह जिल्हाधिकाजयांकडे निवेदनाद्वारे माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली आहे. यावर्षी मान्सून वेळेवर हजेरी लावली होती.त्यामुळे खरीप पिकांची पेरणीही वेळेवरच झाली होती. मात्र नंतरच्याकाळात लातूर जिल्ह्यासह निलंगा विधानसभा मतदारसंघात अतिवृष्टी व सततचा पाऊस झालेला आहे. परिणामी सोयाबीनसह इतर पिकांवर यलो मोझॅक व इतर रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाला आहे. सततच्या पावसाने तर पिके पिवळी पडत असून आता ती हाती लागण्याची शक्यता कमी आहे. तर काही ठिकाणी सोयाबीनची पिके पाण्यात गेल्यामुळे त्याचेही मोठ्या प्रमाणात नासाडी झालीआहे. या परिस्थितीमुळे शेतकजयांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाणार आहे.सदर परिस्थितीने शेतकरी खचला गेला असून त्यांना आधाराची व मदतीची गरज आहे. ही बाब लक्षात घेवूनच नुकसान झालेल्या पिकांचे तत्काळ सरसकट पंचनामे करून त्यांना मदत मिळण्यासाठी संबंधितांना सूचना करावी अशी मागणी माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्यासह जिल्हाधिकारी वर्षा घुगे-ठाकूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी निलंगा विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

16 TO 22 SEPTEMBER 2024 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 9/14/2024 8:55 PM Page 1





'क्राईम संध्या'चे पत्रकार रूपेश वाढे यांच्या कुटुंबाचा वसई रोड येथील निवासस्थानी गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली होती.



'क्राईम संध्या'चे सहसंपादक सोनू जाधव यांच्या भगिनी शशिकला जाधव-साकरकर यांच्या गोरेगाव येथील निवासस्थानी स्थानापन्न गणेश मूर्ती.



वसई गांव झेंडा बाजार येथे राहणारे जयेश शशिकांत राऊत यांच्या निवासस्थानी श्रीगणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.



गुजरात मधील नडीयाद जंक्शन येथील संधाणा गावातील श्री लक्ष्मण वाघेला यांच्या घरी विराजमान गणपती बाप्पाची सुबक मुर्ती.



विरार पद्मावती नगर, बोळींज येथे राहणारे ज्येष्ठ वृत्तछायाचित्रकार अनिल चव्हाण यांच्या निवासस्थानी स्थानापन्न गणेश मूर्ती.





विरार मनवेल पाडा रोड येथील नवनिशिगंधा सोसायटीमध्ये दिड दिवसांच्या गणरायांची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. गणेशाच्या दर्शनासाठी कु. भक्ती पाटोळे, बविआचे कार्यकर्ता व जय जवान मित्र मंडळाचे अध्यक्ष जहिर शेख, रिक्षा युनिय अध्यक्ष प्रेमशंकर गुप्ता व मंडळाचे पदाधिकारी पाटणकर तसेच क्राईम संध्याचे संपादक लक्ष्मणराव पाटोळे यांच्यासह सोसायटीतील व परिसरातील गणेश भक्तांनी दर्शन घेतले.





वसई पश्चिमेकडील दिवाणमान, पाटील चौक येथे गेल्या २९ वर्षांपासून बाल विकास मंडळ आयोजित गौरी उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात येतो. मंडळाचे अध्यक्ष विनोद पाटील, उपाध्यक्ष प्रकाश पाटील, प्रमोद पाटील, हितेश पाटील यांच्यासह महिलांचाही यामध्ये मोलाचा वाटा आहे. गौरीमातेची सजावट व सुंदर असा शृंगार केला होता.



भिवंडीत उत्कृष्ट मूर्तीचा मानकरी म्हणून ओळखला जाणारा व यंदा सार्वजनिक गणेशोत्सवाचे ६६वे वर्ष साजरा करणाऱ्या शहरातील कासार आळी येथील मार्कंडेय मंदिरामध्ये लुप्त होत चाललेला डोंबाऱ्याचा खेळ हे चित्ररुपात रेखाटले असून डोंबाऱ्याच्या रश्शी वर गणपती बाप्पा चालतानाचा देखावा उभा केला आहे. डोंबारी हा खेळ करणारे लुप्त होत असताना त्यावेळी त्यांच्या भोवती खेळ बघण्यासाठी होणारी गर्दी ही सर्व चित्र रुपात विलोभनीय अशी रेखाटली आहे.



सालाबाद प्रमाणे विरार पोलीस ठाण्यात गणरायांची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. विरार पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस कर्मचारी व अधिकारी तसेच परिसरातील महिलांनी गणेशाचे दर्शन घेतले. देखावाही सुंदर साकारण्यात आला आहे.



लातूर येथील भामाबाई शंकरराव पाटोळे यांच्या निवासस्थानातील गौरी (लक्ष्मी) आगमन मोठ्या थाटामाटात झाल्याअसून लक्ष्मींचा अप्रतिम देखावा साकारण्यात आला होता. कॉलनीतील व परिसरातील महिलांनी लक्ष्मीचे दर्शनाचा लाभ घेतला.




प्रज्ञा प्रमोद पाटिल यांच्या घरी विराजमान गणपती बाप्पांची सुंदर व आकर्षक मूर्ती.



नन्दा दत्ताराम आचरेकर यांच्या घरातील श्री स्वामी समर्थ यांचे रूपातील श्री सिद्धिविनायक.



मुंबईतील प्रमोद पेडणेकर यांच्या घरी विराजमान गणपती बाप्पांची सुंदर व आकर्षक मूर्ती.



पालघर जिल्हा श्रमिक ऑटो रिक्षा टॅक्सी चालक-मालक संघटना पुरस्कृत वसई विकास सेवा मंडळाने वसई अंबाडी रोड येथे गेल्या २४ वर्षांपासून सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करतात. मंडळाचे अध्यक्ष विजय खेतले, सचिव मच्छिन्द्र चव्हाण, खजिनदार रामदुलारे मिश्रा, उपाध्यक्ष शरद जळगांवकर, उपाध्यक्ष नेबुलाल धोबी, उपाध्यक्ष रिचार्ड जॉन, संघटक होमी गार्ड, सदस्य सोहनलाल यादव, सदस्य अरुण गुप्ता

# आ. अमित देशमुख यांच्या हस्ते काका गणेश मंडळाच्या श्रीची महाआरती

**लातूर/प्रतिनिधी**



राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि.१३ सप्टेंबर रोजी लातूर शहरातील प्रकाश नगर भागातील श्री दत्त मंदिर या ठिकाणच्या काका गणेश मंडळास भेट दिली. या वेळी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी काका गणेश मंडळाच्या श्रीचे मनोभावे दर्शन घेत श्री गणेशाची महाआरती केली. तसेच काका गणेश मंडळाकडून आयोजित ह.भ.प. गुरुबाबा औसेकर महाराज यांच्या चक्रीभजनाच्या कार्यक्रमास उपस्थिती लावून चक्रीभजनाचा लाभ त्यांनी यावेळी घेतला. दरम्यान यावेळी गणेश मंडळासाठी देणगी दिलेल्या भक्तांमधून लक्की ड्रॉ काढून ११ मुलींना सायकल वाटप करण्यात आली. यावेळी बोलताना ह.भ.प.गुरुबाबा औसेकर महाराज म्हणाले की, राजकीय परंपरा असलेले, अनेक वर्षे विविध क्षेत्रात आपली ओळख निर्माण करणाऱ्या घराऱ्यातील सदस्य माजी मंत्री आमदार अमित देशमुख असून ते आज आपल्या सोबत या ठिकाणी आहेत.राजकीय क्षेत्रात त्यांनी आपले एक वलय निर्माण केले आहे आणि भावी पिढी मुख्यमंत्री म्हणून त्यांच्याकडे पाहत आहे असे म्हणत माजी मुख्यमंत्री आदरणीय लोकनेते विलासराव देशमुख यांच्या आठवणीना उजाळा दिला. पुढे बोलताना ते म्हणाले की, सामाजिक कार्य करताना यासोबतच राजकीय शक्ती आपल्या सोबत असावीच लागते आणि तेच सूर्यकांत कातळे करीत आहेत त्यांना आपण साथ द्यावी. आज सर्वत्र प्रदूषण मोठ्या प्रमाणावर झाले असून यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सायकलचा वापर वापर करायला हवे असे आवाहन करीत सर्वांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमीत विलासराव देशमुख म्हणाले की, भव्यतेची परंपरा, संस्कृतीची जोपासना हे ब्रीद वापरून काका गणेश मंडळ आपले कार्य अविरतपणाने करत आहे याचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. काका गणेश मंडळाच्या सदस्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. सामाजिक बांधिलकी जपत मुलींना ११ सायकल चे वाटप या वर्षी केले जात आहे येणाऱ्या काळात किमान ५० सायकल मुलींना वाटप केल्या जातील असा विश्र्वास आहे. आगामी काळात विधानसभा निवडणूक होत असून राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आणून महाराष्ट्र राज्यावर चे विघ्न दूर करण्यासाठी प्रयत्न करायचे आहेत असे म्हणत उपस्थित सर्व गणेश भक्तांना गणेश उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष ॲड.किरण जाधव, ट्वेन्टीवन शुगर्स व्हा.चेअरमन विजय देशमुख, व्यंकटेश पुरी, प्रा. प्रवीण कांबळे, नागसेन कामेगावकर, ॲड.विजय गायकवाड, चंद्रकांत धायगुडे, विशंभर महाराज, पिंटू साळुंके, दत्ता सोमवंशी, संस्थापक अध्यक्ष-सूर्यकांत कातळे, काका गणेश मंडळ अध्यक्ष-धनंजय शिंदे-पाटील, उपाध्यक्ष- गजानन साळुंके, प्रसाद सोमवंशी, शुभम अप्पा ठेसे, डॉ. कल्याण बरमदे, प्रा.संजय ओहोळ, रमेश सूर्यवंशी, गोटू यादव, सुरज क्षीरसागर, किरण क्षीरसागर, बाळासाहेब देशपांडे यांच्यासह काका गणेश मंडळ पदाधिकारी, सदस्य, प्रभागातील नागरिक गणेश भक्त उपस्थित होते.

# वसईच्या खेळाडूंची आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ५ कांस्य पदकांची कमाई



**वसई/प्रतिनिधी**

बुडापेस्ट येथे नुकत्याच झालेल्या वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये वसईच्या एल.एफ.एम. कराटे आणि किकबॉक्सिंग क्लासेसच्या ५ खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत २ सांघिक इव्हेंट श्रेणींमध्ये ५ कांस्य पदके जिंकली. या यशस्वी खेळाडूंमध्ये युवा आणि जुने कॅडेट्स संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंचा समावेश आहे. टॉरिन बार, जीज्ञा राऊत आणि डेल परेरा हे युवा कॅडेट्स संघाचे विजेते ठरले. तर प्रिती पाटील व स्कार्लेट डायस यांनी जुने कॅडेट्स संघाचे विजेतेपद पटकावले. हे सर्व खेळाडू एल.एफ.एम. कराटे आणि किकबॉक्सिंग क्लासेसचे आहेत. त्यांना वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये आंतराष्ट्रीय पंच म्हणून काम पाहणारे मुख्य प्रशिक्षक सेन्सई सूर्यप्रकाश मुंडापाट, सूर्यप्रकाश मुंडापाट यांनी प्रशिक्षित केले होते. तसेच सागर भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना प्रशिक्षणही देण्यात आले होते. यशस्वी खेळाडूंनी त्यांचे प्रशिक्षक तथा वाको इंडियाचे अध्यक्ष संतोष अग्रवाल आणि वाको महाराष्ट्र अध्यक्ष नीलेश शेलार यांचे आभार मानले आहेत. राष्ट्रीय प्रशिक्षक नीलेश शेलार आणि सिद्धार्थ भालेगरे यांनी संपूर्ण स्पर्धेत मिळालेल्या सततच्या पाठिंब्यासाठी विशेष आभार व्यक्त केले आहेत. या यशाबद्दल वसई-विरारचे मुख्य संरक्षक आफीफ शेख आणि वसई तालुका कला-क्रीडा मंडळ कमिटीचे प्रमुख प्रकाश वनमाळी यांनी खेळाडूंनी मिळवलेल्या भरीव यशाबद्दल आनंद व्यक्त केला आहे. वसई-विरार महापालिका आणि वसईचे आमदार हितेंद्र ठाकुर यांनीही या खेळाडूंसाठी वेळोवेळी मदतीचा हात दिला आहे. या खेळाडूंना प्रशिक्षणासाठी सहजीवन हॉलचे प्रमुख ओनिल आल्मेडा, लोकसेवा मंडळाचे प्रमुख गॉडफ्री सर आणि क्षेत्रपालेश्वर मंदिराचे प्रमुख सुहास जोशी यांचेही विशेष आभार मानले आहेत.